cmyk

## संपादकीय

### वाचाळविरांना थारा नको !

कॉमेडियन समय रैना याचा शो 'इंडियाज गॉट लेटेंट'ची चौफेर कोंडी झाली हे चांगले झाले. या शोमध्ये बोलताना रणवीर अलाहाबादीयाने अश्लील शब्दांचा उपयोग केला होता. मुंबईपासून दिल्लीपर्यंत आणि पंचायतीपासून संसदेपर्यंत त्याचे पडसाद उमटले. विविध प्रकारची चौकशी सुरू आहे आणि संबंधित टिप्पणी करणार्या अलाहाबादीयाने पश्चाताप झाल्याचे भासवत माफीही मागितली. त्याला खरेच पश्चाताप झाला असेल तर या माफीमुळे त्याच्या मनावरचा बोजा कमी होईल. त्याच्याबद्दल लाख संताप असला तरी त्याने एका विषयावरच्या चर्चेला तोंड फोडले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com




बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२९४ | रविवार, दि.१६ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


# शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन पेटणार!

## २० फेब्रुवारीला आ.सतेज पाटलांच्या उपस्थितीत बैठक, १२ जिल्ह्यांतील शेतकरी राहणार उपस्थित

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**महायुती सरकारने शपथविधी घेतल्यानंतर शंभर दिवसांतील कामांच्या उद्दिष्टांमध्ये शक्तिपीठ महामार्गाचा समावेश केला आहे. यामुळे शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकरी आपल्या आंदोलनाची तीव्रता वाढविण्याच्या तयारीत आहेत. आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी महामार्गबाधित १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची राज्यव्यापी बैठक गुरुवारी (दि.२०) सकाळी ११ वाजता, दसरा चौक येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात होणार आहे, अशी माहिती विधान परिषद गटनेते आमदार सतेज पाटील व संघर्ष समितीचे समन्वयक गिरीश फोंडे यांनी शनिवारी (दि.१५) दिली.**

शक्तिपीठला कोल्हापूरसह अन्य जिल्ह्यांचा लढा तीव्र करण्यासाठी संघटीत होणे गरजेचे असल्याचे म्हणत सतेज पाटील म्हणाले की, ''डिसेंबर महिन्यात शपथ घेतल्यानंतर महायुती सरकार हे गोवा ते नागपूर शक्तिपीठ महामार्ग करण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहे. वेगवगेळे आराखडे तयार केले आहेत, अशा बातम्यादेखील सरकार फिरवत आहे; पण कोणतेही अधिकृत पेपर सर्क्युलर, नोटिफिकेशन सरकारकडून प्रसिद्ध होत नाही. हा महामार्ग करण्यासाठी ते खोट्या प्रचाराचादेखील आधार घेत आहेत. सर्वप्रथम त्यांनी वस्तुस्थितीचा विपर्यास





करत सांगितले की, या महामार्गाला फक्त कोल्हापुरातून विरोध आहे''. असे सतेज

### शक्तिपीठ महामार्ग सर्वांचेच नुकसान करणारा

''शक्तिपीठ महामार्गातून शेतकऱ्यांचे, पर्यावरणाचे, करदात्यांचे, जनतेचे सर्वांचेच नुकसान होणार आहे. पर्यायी महामार्ग असताना त्याचे रुंदीकरण व दर्जा सुधारण्याची गरज असताना केवळ कंत्राटदारांच्या भल्यासाठी हा महामार्ग रेटण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री फडणवीस करत आहेत. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी राज्यातील एकजूट घडवत आरपारची लढाई करायचे ठरवले आहे, असे आ.सतेज पाटील म्हणाले.

पाटील म्हणाले.''खरे तर या विरोधात १२ पैकी १० जिल्ह्यांमध्ये शेतकरी गेल्या फेब्रुवारी २०२४ पासून आंदोलन करत आहेत. याला उत्तर म्हणून १० जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी २४ जानेवारीला राज्यव्यापी धरणे आंदोलन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गृहमंत्रीसुद्धा आहेत. त्यांना त्यांचे 'इंटेलिजन्स' व पोलिस हे या सर्वांची माहिती देतात. तरीही वस्तुस्थितीचा विपर्यास करत शक्तिपीठ महामार्गाला सर्व आमदारांनी समर्थन दिले आहे, असे भाष्य मुख्यमंत्री फडणवीस यांनी दुसऱ्यांदा नांदेडमध्ये केले. प्रत्यक्षात आमदारांचा पाठिंबा ही गोष्ट खरी नाही.'' असे सतेज पाटील म्हणाले. राजर्षी शाहू महाराजांच्या भूमीमध्ये ◀◀ पान २ वर

# बार्शी नाका रेल्वे स्टेशनसाठी होणार सर्वेक्षण

## खा.बजरंग सोनवणेंनी दिलेला शब्द राखला; रेल्वेमंत्र्यांकडून तातडीने दखल

**बीड। प्रतिनिधी**

**अहल्यिानगर–बीड रेल्वेची जलदगती चाचणी झाली असून बार्शी नाका इमामपूर रोड परिसरात रेल्वेला थांबा देण्यात यावा, अशी रेल्वे कृती समितीने दि.२५ जानेवारी २०२५ रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्याकडे केली होती. यावेळी खा.सोनवणे यांनी 'तुम्ही चिंता सोडा, बार्शी नाका येथे रेल्वे थांबा मंजूर करून घेतो,' असा शब्द दिला होता. हाच शब्द राखत खा.सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांची भेट घेतली. यानंतर बार्शीनाका ( इमामपूर रोड) रेल्वे स्टेशनसाठी तातडीने सर्व्हेक्षण करावे, असे नर्दिश केंद्रीय मंत्र्यांनी रेल्वे विभागाला दिले आहेत.**



रेल्वे हा बीडच्या जव्हिाळ्याचा विषय आहे. लोकसभा निवडणूक झाल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी पहिली बैठक रेल्वे विभागाची घेवून बीडला रेल्वे आणण्यासाठी कालावधी ठरवून दिला. पहिला टप्पा अंमळनेर ते विघनवाडी, विघनवाडी ते नवगण राजुरी असे दोन टप्पे पुर्ण केले. आता बीडपर्यंत जलदगती रेल्वेची चाचणी देखील झाली असून आहे.सद्यस्थितीत पालवण परिसरात रेल्वे स्टेशन झालेले असून बार्शी नाका परिसरातील नागरिकांना हे गैरसोयीचे होत असल्याचे बीड रेल्वे कृती समितीचे मत आहे. कृती समितीने खा.बजरंग सोनवणे यांच्यासोबत दि.२५जानेवारी रोजी बैठक आयोजीत केली होती. यावेळी कृती समितीने रेल्वेबाबतच्या मागण्याच्या निवेदन खा.सोनवणे यांना दिले होते. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी बार्शी नाका परिसरात रेल्वे थांबा देण्याबाबत आपण प्रयत्न करू, तो विषय माझ्यावर सोडा, असा वश्विास दिला होता. अवघ्या १७ दिवसात या विषयाला गती देण्यात आलेली आहे. कृती समितीला शब्द दल्यिानंतर ◀◀ पान २ वर

# शेतकऱ्यांना म्हणणारे भाजपा युतीचे सरकारच भिकारी

## नाना पटोले यांची खोचक टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्ष युतीचे सरकार हे शेतकरी विरोधी आहे हे वारंवार उघड झाले आहे. शेतकऱ्याला अतिरेकी, नक्षलवादी, आंदोलनजीवी म्हणून त्यांचा अपमान केला. आता राज्यातील कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांना भिकारी म्हणून अकलेचे तारे तोडले आहेत. कोकाटे यांचे शेतकऱ्यांबद्दलचे विधान सत्तेचा माज आल्याचे दर्शवते. शेतकरी भिकारी नाही तर शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनतेला जीएसटीच्या माध्यमातून लुटणारे भाजपा युती सरकारच भिकारी आहे, असा हल्लाबोल नाना पटोले यांनी केला.**



कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधानाचा समाचार घेत नाना पटोले म्हणाले की, शेतकरी जगाचा पोशिंदा आहे त्याचा अपमान करणे ही विकृती आहे. भाजपा युती सरकार हे शेतकरी विरोध असून फक्त धनदांडग्यांसाठी काम करत आहे. सरकार एक रुपयात पीक विमा देते म्हणजे शेतकऱ्यांवर उपकार करत नाही आणि हे पैसे माणिकराव कोकाटे त्यांच्या खिशातून देत नाहीत. सरकार शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव देत नाही, कर्जमाफी देत नाही. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना भरमसाठ आश्वासने देऊन भाजपा युतीने मतांची भिक मागितली. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या कृषी साहित्यावर १८ टक्के जीएसटी लावून सरकार शेतकऱ्यांकडूनच भिक घेते आणि वरून शेतकऱ्यांनाच भिकारी म्हणते. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, शेतकऱ्यांच्या नावावर विविध योजनांमध्ये कृषी मंत्रालय कशी मलई खाते याचा पर्दापाश नुकताच आम्ही केला आहे. पीक विमा योजनेतही भ्रष्टाचार झाल्याचे ◀◀ पान २ वर

## दिल्लीत नव्या चेहऱ्याला संधी मिळण्याची शक्यता


नवी दिल्ली। वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांचा अमेरिका दौरा पूर्ण करून देशात परतले आहेत आणि दिल्लीच्या नवीन सरकारसाठी संभाव्य चेहऱ्यांवर त्यांच्यासोबत चर्चा केली जाईल. यानंतरच अंतिम नाव निश्चित केले जाईल. नवीन सरकारचा शपथविधी समारंभ १९ किंवा २० फेब्रुवारी रोजी होण्याची शक्यता आहे. भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी लवकरच निरीक्षकांची नियुक्ती केली जाईल. दरम्यान, लक्ष्मी नगर मतदारसंघातून दुसऱ्यांदा आमदार

# महाकुंभमेळ्यात पुन्हा भीषण आग ; अनेक शिबिरं जळून खाक

**प्रयागराज । प्रतिनिधी**

**प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात सेक्टर १८ आणि १९ मध्ये शनिवारी अनेक शिबिरांमध्ये आग लागली. आगीच्या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. या घटनेत सुदैवाने कोणतीही जिवितहानी झालेली नाही. आगीचे नेमके कारण संध्याकाप पर्यंत स्पष्ट झाले नव्हते.**



महाकुंभ मेळयात असलेल्या लवकुश धाम कँपमध्ये ही आग लागली. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीत कोणतीही जिवीतहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. आग लागल्याच्या घटनेनंतर परिसरात मोठा गोंधळ उडाला. महाकुंभ मेळ्यात आलेल्या भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र प्रशासनाने परिस्थिती हाताळत आग आटोक्यात आणली. ◀◀ पान २ वर

# नवीन तंत्रज्ञान निर्माण करण्यासाठी ठोस कार्यवाहीची आवश्यकता–राहूल गांधी



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भारतात प्रतिभा असली तरी, तरुणांना नोकऱ्या देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानात औद्योगिक कौशल्य निर्माण करण्यासाठी पोकळ घोषणा नाही तर ठोस कार्यवाहीची आवश्यकता आहे, अशी टिका काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर केली आहे. 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये, राहुल गांधींनी चीनने ड्रोनचे उत्पादन कसे सुरू केले आहे यावर प्रकाश टाकला. हे उत्पादन जगभरात युद्धात क्रांती घडवत आहे, असे ते म्हणाले. भारताला या क्षेत्रात स्पर्धात्मक बनण्यासाठी एक धोरण विकसित करण्याची आवश्यकता आहे, असे ते म्हणाले.**

राहुल गांधी म्हणाले की, दुर्दैवाने ◀◀ पान २ वर

## वक्फ विधेयक मुस्लिमांविरोधात असल्याची काहींकडून दिशाभूल – मंत्री किरेन रिजिजू

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**भारतात अनेक मुस्लिम कुटुंब श्रीमंत नाहीत. वक्फ मालमत्तेचा लाभ सर्वांना मिळाला पहिजे. काही लोक दिशाभूल करत आहेत की, वक्फ दुरुस्ती विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे. पण, तसे नाही. आपला देश कायदा, संविधान आणि व्यवस्थेवर चालतो. सरकार किंवा कोणतीही व्यक्ताही, असे अल्पसंख्यांक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी शनिवारी (दि.१५) माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.**


जम्मू-काश्मीर दौऱ्यावर असलेले रिजिजू म्हणाले की, जगात सर्वाधिक वक्फ मालमत्ता भारतात आहेत. देशात अनेक मुस्लिम कुटुंब श्रीमंत नाहीत. त्यांनाही ◀◀ पान २ वर



# 'छावा' महाराष्ट्रात टॅक्स फ्री करा; सत्तेतील राष्ट्रवादीच्या नेत्याची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजी महाराज यांची शौर्यगाथा उलगडणारा आणि जीवनचरित्रावर आधारित छावा चित्रपट १४ फेब्रुवारी रोजी देशभरात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला पहिल्याच दिवशी शिवभक्त आणि सिनेचाहत्यांचा उदंड प्रतिसाद मिळत असून सिनेमागृहात चाहत्यांची तुफान गर्दी पाहायला मिळत आहे. वाढता प्रतिसाद आणि इतिहास सांगणारा हा चित्रपट महाराष्ट्रात टॅक्स फ्री करावा, अशी मागणी सत्तेत असलेल्या राष्ट्रवादीकडून करण्यात आली आहे.**




छावा चित्रपट पाहिल्यानंतर सिनेमागृहाबाहेर येणारे प्रेक्षक डोळ्यातून अश्रू ढाळत असल्याचे दिसून येत आहे. अंगावर शहारे आणणारे प्रसंग ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.०० क्विंटल | २,५०० | ३,५०१ | २,९६६ |
| ज्वारी/हायब्रिड: १८.५० क्विंटल | १,९१० | २,९०० | २,२५० |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ६४.५० क्विंटल | ७,२०० | ७,५०० | ७,३४९ |
| उडीद : १८.०० क्विंटल | २,६०० | ३,२३६ | २,९२८ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,५०० | २,५९१ | २,५४५ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| सोयाबीन: ६६.०० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| हरभरा: १८.०० क्विंटल | ५,५०० | ५,७०१ | ५,६३४ |

# महाराष्ट्रात लवकरच लव्ह जिहाद विरोधी कायदा!

## सरकारकडून सात सदस्यीय समितीची स्थापना

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार 'लव्ह जिहाद'विरुद्ध कडक कायदा आणण्याच्या तयारीत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस सरकारने महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक (डीजीपी) यांच्या नेतृत्वाखाली ७ सदस्यांची समिती स्थापन केली आहे. ही समिती 'लव्ह जिहाद'शी संबंधित सर्व कायदेशीर आणि तांत्रिक बाबींवर चर्चा करून एक अहवाल तयार करून हा अहवाल सरकारला सादर करणार आहे.**



गृह विभागाने एक सरकारी आदेश जारी केला आहे. ज्यामध्ये राज्यात लव्ह जिहाद, फसवणूक किंवा जबरदस्तीने धर्मांतर करण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे हे प्रकार थांबवण्यासाठी अनेक संघटना आणि काही नागरिकांकडून कायदा करण्याच्या विनंत्या आल्या आहेत, असे लिहिले आहे. भारतातील काही राज्यांमध्ये लव्ह जिहाद आणि फसवणूकीलाही वेग आला आहे, त्यामुळे धर्मांतर रोखण्यासाठी कायदे करण्यात आले आहेत. सरकारी आदेशात, विभागाने म्हटले आहे की, महाराष्ट्रातील लव्ह जिहाद आणि फसव्या किंवा सक्तीच्या धर्मांतराच्या परिस्थितीचा अभ्यास इतर राज्यांच्या तुलनेत केला जात आहे. प्राप्त झालेल्या तक्रारींवर उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी, इतर राज्यांमधील कायदे आणि कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी तसेच कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी समितीला एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. राज्यातील सध्याची ◀◀ पान २ वर

### हे असणार समितीत

राज्यातल्या धर्मांतराच्या तक्रारीनंतर या विरोधात कायदा करण्याची ग्वाही तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती. त्यानुसार राज्य सरकारने पोलिस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. या समितीत महिला व बालकल्याण विभागाचे सचिव, अल्पसंख्यांक विकास विभागाचे सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, गृहविभागाचे सचिव तसेच गृह विभागाचे (विधी) सचिव हे सदस्य असतील.

cmyk

## अग्रलेख

# वाचाळविरांना थारा नको !

कॉमेडियन समय रैना याचा शो 'इंडियाज गॉट लेटेंट'ची चौफेर कोंडी झाली हे चांगले झाले. या शोमध्ये बोलताना रणवीर अलाहाबादीयाने अश्लील शब्दांचा उपयोग केला होता. मुंबईपासून दिल्लीपर्यंत आणि पंचायतीपासून संसदेपर्यंत त्याचे पडसाद उमटले. विविध प्रकारची चौकशी सुरू आहे आणि संबंधित टिप्पणी करणार्या अलाहाबादीयाने पश्चाताप झाल्याचे भासवत माफीही मागितली. त्याला खरेच पश्चाताप झाला असेल तर या माफीमुळे त्याच्या मनावरचा बोजा कमी होईल. त्याच्याबद्दल लाख संताप असला तरी त्याने एका विषयावरच्या चर्चेला तोंड फोडले आहे. तो विषय आहे मर्यादा आणि भान. समाजातील सगळेच घटक काही बाबींकडे दुर्लक्ष करतात. कोणी वेळ नाही म्हणून तर कोणी धारिष्ट्य नाही म्हणून. किंवा मी बोलून काय होणार आहे व त्याने काय फरक पडणार आहे याचीही जाणीव असल्यामुळे विषयावर बोलायचे टाळले जाते.

ज्यांच्याकडे रोखण्याची किंवा धाक दाखवण्याची जबाबदारी अन्? पात्रता असते ते उदासीन असतात तर काही जण त्यांच्या अर्थकारणामुळे कानाडोळा करतात. यातून चुकीच्या प्रवृत्तींचे फावते. ज्या गोष्टी करायला अथवा बोलायला नको त्यांची जाहीर वाच्यता केली जाते आणि त्याला ग्लॅमर देत त्याचा मार्गही प्रशस्त केला जातो. रणवीर अलाहाबादीयाच्या आगाऊपणामुळे एक बाब चांगली झाली की लोक मग प्रांत आणि स्तर कोणताही असो त्याच्यावर तुटून पडले आणि राजकीय मतभेद असणार्यांनाही त्याच्या विरोधातच भूमिका घ्यावी लागली आणि व्यक्त व्हावे लागले.

भारतीय समाजात किंवा एकूणच सभ्य समाजात काही मर्यादा पाळाव्या लागतात. त्याकरता जगावेगळे काही करावे लागत नाही; मात्र जे विषय वर्जित आहे त्यावर बोलणे टाळले जाते. कुटुंबात काही गोष्टी जशा बोलत नाहीत तशाच बाहेरही काय बोलायचे, कशावर बोलायचे आणि कुठपर्यंत बोलायचे याचे काही सूत्र असते. त्याची कोणती नियमावली नाही. मात्र, संकेत असतात आणि ते पाळणेच चांगले असते. कुटुंबात वडिलधार्यांसमोर किंवा आपल्यापेक्षा कनिष्ठांसमोर आपण त्यांचा मान अथवा कनिष्ठांचे वय काय आहे याचे भान ठेवत अश्लील बोलत नाही. मात्र, विनोदाचे किंवा कॉमेडीचे वेगळे आहे. लोकांना हसवणे कठीण असते. यापासून भलावणीला सुरुवात झालेल्या कॉमेडीला कोणताही विषय वर्ज्य नाही. 'टवाळा आवडे विनोद' असे लाख म्हटले गेले असले आणि ते चुकीचे असले तरी विनोद आणि टवाळीची सांगड घालण्याचाच आजच्या विनोदवीरांकडून कसोशीने प्रयत्न केला जातो आहे. एखादी गोष्ट फार काळ कोंडून ठेवली तर त्याचा स्फोट होतो असे मनोविज्ञान सांगते ते बरोबर आहे. अशा कोंडमारा झालेल्या गोष्टींचा निचरा करण्यासाठी विनोदाची साथ जरूर घेतली जावी, पण ती कुठपर्यंत आणि कशी असावी याचेही तारतम्य सुटता कामा नये.

प्रगती आणि संपन्नतेबाबत आपण बोलतो. आपले नेतेमंडळही ते सांगत असतात. तथापि, आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीसोबत आपल्या संस्कारांची अधोगती व्हायला नको ही जबाबदारीही सांभाळायची असते. तंत्रज्ञानाने तुम्हाला झटपट प्रसिद्ध होण्याची साधने उपलब्ध करून दिली आहेत. त्या माध्यमातून चटकन कोणत्याही अडथळ्याशिवाय सर्वत्र पोहोचता येते. मात्र, हाच निरंकुश प्रवास विकृतीला किंवा फाजील विचारांना आणि वर्तणुकीलाही प्रसिद्धीचा राजमार्ग बहाल करतो आणि एकाने केले म्हणून सगळे तसेच करत जातात व बघता बघता तो प्रघात होतो. 'इंडियाज गॉट लेटेंट'मुळे जो वाद निर्माण झाला आहे त्यातून आपली युवा पिढी काय विचार करते याचे प्रातिनिधिक चित्र समोर आले आहे.

युवकांचे विचार या स्तरावर गेले आहेत का आणि आधुनिकतेच्या नावाखाली आपण नीतिमूल्यांनाच तिलांजली दिली आहे का? आपल्या आई-वडिलांबाबत बोलतानाही किंचितही लाज वाटत नसणारी पिढी एवढी निर्ढावली आहे का, हे प्रश्न चर्चेला आले आहेत. झाल्या प्रकरणामुळे केवळ सांस्कृतिक, नैतिक आणि म्हटलेच तर कायदेशीरबाबतच चर्चा पुरेशी नाही तर कौटुंबिक आणि सामाजिक व्यवस्था तरी निरोगी राहिली आहे का, याचाही अभ्यास करावा लागणार आहे. पूर्वी स्वत:ला व्यक्त करण्यासाठी माध्यमे मर्यादित होती.

जी मोजकी माध्यमे होती तेथे नैतिक आणि सामाजिक धाक दाखवणारी जबाबदार आणि वयाने व अनुभवानेही ज्येष्ठ असणारी मंडळी छाननी करण्यासाठी असायची. माध्यमांची आताची घाऊक उपलब्धता व त्यांचा स्वच्छंदी वापर यात सगळ्या गाळण्या आणि छानन्या केव्हाच नाहीशा झाल्या आहेत. स्टँडअप कॉमेडी, इंटरनेट मीडिया अथवा ओटीटी अशा नवमाध्यमांतून अश्लीलतेचा निर्बंध आणि भयमुक्त प्रसार सुरू आहे. काय बोलायचे, काय करायचे आणि काय दाखवायचे या कसल्याचेच बंधन राहिलेले नाही व त्याहीपेक्षा गंभीर म्हणजे स्वत:ला क्रिएटर म्हणवणार्या आणि मानणार्यांकडून हे सगळे जे केले जाते ते जसेच्या तसे सगळीकडे पोहोचते.

इन्स्टाग्राम, फेसबुक आणि यूट्युबवर अश्लील आणि अश्लाघ्य कंटेंटचा जो भडिमार होतो आहे त्यातून नवी पिढी वेगाने त्याच्या चक्रव्युहात अडकत चालली आहे. तथाकथित क्रिएटर लोकांना यामधून कमाईचे साधन उपलब्ध झाले असले तरी त्याचे मूल्य समाजाला चुकवावे लागणार आहे. भारतात मुळात आज चित्रपट असतील किंवा अन्य काही माध्यमांवरचा कंटेंट असेल तो बहुतांशत: विदेशी माध्यमांतून ढापलेला किंवा उचलेगिरी केलेला असतो. पूर्वीप्रमाणे भारतीय साहित्य आणि संस्कृतीचा आधार त्याला नसतो तर ती निर्बुद्ध कॉपी असते. ती करताना तेथील संस्कृती आणि तेथील जीवनशैली ध्यानात न घेता आपल्याकडे अगदी हुबेहूब नक्कल सादर केली जाते जी आपल्या आजवरच्या जडणघडणीला आणि संस्कारांना उद्ध्वस्त करणारीच असते. आधुनिकतेच्या नावाखाली विकृतीला आणि असभ्यतेला कवटाळले जाते आणि चलता है, असा मुलामा देत त्याचे समर्थन केले जाते. त्यातून मग अचानक एखादा रणवीर अलाहाबादीया जाहीरपणे असले काही बोलतो की स्वत:च्या आत डोकावतानाही भय वाटू लागते. लेटेंट आणि अन्य प्रकारातून येणार्या कंटेंटमुळे आज सामाजिक संतुलनाच्या अस्तित्वालाच संकट निर्माण केले जाते आहे. त्यामुळे कसलाच पायपोस नसणार्या या क्रिएटर मंडळींवर लक्ष ठेवण्याची आणि त्यांनाही कॉमेडीच्या नावाखाली स्वैर वागता येणार नाही याकरता सीमारेषा आखून देण्याची गरज आहे.

---

## आत्महत्या प्रकरणी आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर-अ‍ॅड.नेहरकर



**बीड । प्रतिनिधी**

वाहन चालक ज्ञानेश्वर महानोर हे मामा उगले रा. केज यांच्याकडे ड्रायव्हर म्हणून काम करत होते, त्या आयशर टेम्पोवर ड्रायव्हर म्हणून काम करत असताना दि. ०९/०८ /२०२४ रोजी त्या टेम्पोचा अपघात झाला होता. तो अपघात झाल्या प्रकरणी टेम्पोचे नुकसान भरपाई म्हणून नाना उगले हे मयत ज्ञानेश्वर यांना नुकसान भरपाई म्हणून दोन लाख रुपयांची मागणी करत होते व दिनांक २० /८ /२०२४ रोजी नाना उगले यांनी संबंधित फिर्यादी व मयत यांना मारहाण करून दुकानात दाबून ठेवले होते. त्यामुळे ज्ञानेश्वर याने बाग पिंपळगाव येथे राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. नाना उगले यांच्या त्रासाला कंटाळून ज्ञानेश्वर याने गळफास घेऊन आत्महत्या केली अशी फिर्याद गेवराई पोलिस स्टेशन येथे दि. २६/०८/२०२४ रोजी दाखल करण्यात आली होती. त्या प्रकरणी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज अ‍ॅड. तेजस सुभाष नेहरकर यांच्यामार्फत जिल्हा न्यायालय बीड येथे दाखल करण्यात आला होता. त्यावर अ‍ॅड. तेजस नेहरकर यांचा उत्कृष्ट युक्तिवाद व आरोपीच्या वतीने मांडलेली भक्कम बाजू यावरून दिनांक १३/०२/२०२५ रोजी मा. न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

---

## महसूल सहाय्यक पदासाठी निवड झालेल्या प्राजक्ता तांगडे यांचा ढेकणमोहा येथे सत्कार




**ढेकणमोहा । पतिनिधी**

**बीड तालुक्यातील बोरदेवी येथील शेतकरी कुटुंबातील प्राजक्ता रामेश्वर तांगडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करून महसूल सहाय्यक अधिकारी पदासाठी निवड मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी ढेकणमोहा येथील पसायदान सेवा प्रकल्प येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.**

या कार्यक्रमात प्राजक्ता तांगडे यांना शुभेच्छा देताना पसायदान सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे व संचालिका रंजना गोवर्धन दराडे यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ बीड युवा अध्यक्ष सुभाषराव तांगडे, ढेकणमोहा माजी सरपंच नागेश शिंदे, राहुल कांबळे, प्राजक्ताचे वडील रामेश्वर तांगडे, सखाराम शिंदे, भानुदास तांगडे, परमेश्वर तांगडे, पवन दराडे, रोहन दराडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्राजक्ता तांगडे यांच्या यशाने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्या भविष्यात अधिक उत्तुंग भरारी घेतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

---

## रेशनचा गहू-तांदूळ अंबड मध्ये पकडला

**अंबड । प्रतिनिधी**

प्रशिक्षणार्थी पोलीस अधिक्षक सिध्दार्थ बारवाल यांना अंबड मधून राशनचा तांदुळ व गहु हा काळया बाजारात विक्री साठी जात असल्याची माहीती मिळताच स्वताः प्रशिक्षणार्थी पोलीस अधिक्षक सिध्दार्थ बारवाल व पोउपनि ठुबे, पोकों अशोक म्हस्के यांचे सह मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी तात्काळ जाऊन कारवाई केली यामध्ये टाटा एस क्र. -०४--४०३२ व -२०--००२८ असे आठवडी बाजार अंबड व माळी गल्ली अंबड येथुन सदरची दोन्ही वाहने ताब्यात घेवुन पोलीस ठाणे अंबड येथे आणून सदर वाहनांची पंचासमक्ष पाहणी करता त्यामध्ये एकुण १५ क्विटंल राशनचा काळया बाजारात जाणारा तांदुळ व गहु मिळून आले वरुन ४,३०,०००/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला सदरचा गहु व तांदुळ राशनचा आहे किंवा कसे? याबाबत तहसील कार्यालय अंबड येथे अंबड येथे पत्र व्यवहार करण्यात आला आहे. याप्रकरणी पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय अंबड तपासणी करून गुन्हा दाखल करण्यात येईल अशी माहिति पोलीस उपनिरीक्षक ठुबे यांनी दिली.

---

## स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचे कला, क्रीडा कौशल्य विकसित होते-जि.स.क.अधिकारी श्रावस्ती मेश्राम

### गेवराईत रंगल्या दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा ; मान्यवरांच्या हस्ते झाला शुभारंभ



**गेवराई । प्रतिनिधी**

**दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषदेमार्फत विविध उपक्रम राबविले जातात. दरम्यान दरवर्षी जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना आपले कला, क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी प्रोत्साहन मिळते तसेच त्यांच्या कला गुणांना वाव मिळतो असा विश्वास बीडच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम यांनी येथे व्यक्त केला.**

.जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद बीड व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचा भव्य शुभारंभ शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी गेवराईच्या क्रीडा संकुलावर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा समाज कल्याण अधिकारी मेश्राम बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर बीड जि.स.कल्याण विभागाचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुश नखाते, विस्तार अधिकारी अंबादास चव्हाण , ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष ज्ञानोबा गोतावळे, सचिव राजेश गोतावळे, दिव्यांग संघटनेचे दत्ता गिरी यांच्यासह आदी मान्यवर व पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी आयोजित दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत बीड जिल्ह्यातील अस्थिव्यंग , मुकबधीर, मतिमंद या प्रवर्गातील एकुण ४३ दिव्यांग शाळेतील ४५० विद्यार्थी व २५० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला असून बीड जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी आजपर्यंत विविध पातळीवर आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी केलेली कामगिरी अतिशय कौतुकास्पद आहे. या विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांचा विकास करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा पातळीवर होणारी ही क्रीडा स्पर्धा उपयुक्त ठरणार आहे. शासन, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यात दिव्यांग बांधवांसाठी अतिशय चांगले उपक्रम राबविले जातात. या माध्यमातून दिव्यांग बांधवांच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करण्यात येत असून बीड जिल्ह्यातील ४३ शाळांमधील जवळपास ४५० दिव्यांग विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. दिव्यांगत्व प्रकारानुसार आणि वयोगटानुसार विविध गटात स्पर्धा होत असल्याचे जिल्हा समाज कल्याण विभागाचे वै.सा.का अंकुश नखाते यांनी आपल्या प्रास्ताविकात बोलताना सांगितले. प्रारंभी स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्साही वातावरणात पथसंचलन केले. त्यानंतर क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. तसेच संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करुन थोर महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून केलेल्या टिकाऊ वस्तुंच्या प्रदर्शन स्टॉलला मान्यवरांनी भेटी देवून पाहणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण पांडव व विनोद पौळ यांनी तर आभार राजेश गोतावळे यांनी व्यक्त केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा समाजकल्याण कार्यालय, बीड व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी तसेच कै.केशवरावजी धांडे मतिमंद निवासी विद्यालय, तलवाडा व गेवराई येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

> **"जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी ४३ दिव्यांग शाळेतील ४५० विद्यार्थ्यांचा सहभाग..**
>
> गेवराई शहरातील तालुका क्रीडा संकुल, नगरपरिषद क्रीडागण येथे आयोजित जिल्हास्तरीय दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेत अस्थिव्यंग, मुकबधीर, मतिमंद या प्रवर्गाच्या ४३ शाळेतील एकुण ४५० विद्यार्थी स्पर्धेमध्ये सहभागी झाले आहेत तर २०० ते २५० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सहभागी मुलांसाठी गेवराईतील बेद्रे लॉन्स येथे तर मुलींसाठी साई सिद्धी हॉल येथे निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. हा कार्यक्रम दोन दिवशीय आहे.

---

## माजी आ.सुरेशकुमार जेथलिया यांचा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश



**जालना । प्रतिनिधी**

**परतुर येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत परतुर चे माजी आमदार सुरेश कुमार जेथलिया, परतुर न.प. च्या माजी नगराध्यक्षा सौ.विमल ताई जेथलिया, यूवा नेतृत्व नितीन जेथलिया, यांनी आपल्या हजारो कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृतपणे प्रवेश केला आहे.**

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री अजित पवार , तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांची उपस्थिती होती. तसेच यावेळी प्रमुख उपस्थित मराठवाड्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजेश विटेकर, सिंदखेडराजा येथील आमदार मनोज कायंदे, आमदार सतीश चव्हाण, माजी आमदार तथा जालना जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण, नांदेड जिल्ह्याचेआमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी विभागीय आयुक्त मधुकर राजे आर्दड, बुलढाणा जिल्हाध्यक्ष नाजेर काजी, राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष अ.वि. कयूम खान पठाण, जालना जिल्हा अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग,तथा मौलाना आझाद महामंडळाचे डायरेक्टर, शाह आलम खान, प्रदेश सचिव बळीराम कडपे, प्रदेश पदाधिकारी डॉ. रवींद्र तौर, यांच्यासह राष्ट्रवादीचे आमदार प्रदेश पदाधिकारी सर्व सेलचे अध्यक्ष कार्यकर्त्यांची उपस्थिती होती त्यानिमित्ताने आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनेक मान्यवरांनी प्रवेश केला .

---

## पान १वरून...

**शक्तिपीठ महामार्गाविरोधात**

राज्यव्यापी बैठक घेऊन तेथून आंदोलनाचे रणशिंग फुंकले जाणार आहे. या व्यापक बैठकीस कोल्हापूरसह बारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे'', असे आवाहनही आमदार सतेज पाटील व गिरीश फोंडे यांनी केले.

-----------

**शेतकऱ्यांना म्हणणारे भाजपा**

उघड झाले आहे. शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांची जाहीर माफी मागावी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृषी मंत्र्यांची हकालपट्टी करावी अशी मागणीही यावेळी केली.

-----------------

**बार्शी नाका रेल्वे स्टेशनसाठी**

खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची दल्लीत भेट घेवून पत्र दिले होते. यानूसार आता केंद्रीय मंत्र्यांनी रेल्वे विभागाला रेल्वेस्टेशनच्या बाबतीत सर्व्हेक्षण करण्याचे नर्दिश दिले असल्याचे दि. १२ फेब्रुवारीच्या पत्रान्वये रेल्वेमंत्री यांनी खा. सोनवणे यांना कळविले आहे. एकूणच, खा.बजरंग सोनवणे यांनी दिलेला शब्द राखण्यासाठी प्रयत्नवादी आहेत. येणाऱ्या काळात हा विषय मार्गी लागणार आहे.

------------

**महाकुंभमेळ्यात पुन्हा भीषण आग**

महाकुंभ मेळ्यात याआधीही आगीच्या घटना घडल्या आहेत. अरैलच्या बाजूला असणाऱ्या सेक्टर २३ मध्ये ९ फेब्रुवारीला रात्रीच्या वेळेत भीषण आग लागली होती. य़ा घटनेनंतर अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली होती. ती आग गॅस सिलिंडरमुळे लागल्याचे सांगण्यात आले होते. ३० जानेवारीलासुद्धा आग लागली होती. यात १२ पेक्षा जास्त तंबू जळाले होते.

-----------

**दिल्लीत नव्या चेहऱ्याला संधी**

झालेले अभय वर्मा म्हणाले की, दिल्लीच्या मुख्यमंत्री पदासाठी कोणतीही स्पर्धा नाही. ते म्हणाले की, आमच्या पक्षात मुख्यमंत्री किंवा विधिमंडळ पक्षाचा नेता आमदारांच्या बैठकीत निवडला जातो. दिल्ली सरकारमधील सर्वोच्च पदासाठी संभाव्य उमेदवार म्हणून पूर्वांचली वर्मा यांचे नावही चर्चेत आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदासाठी ज्या चेहऱ्यांची चर्चा सुरू आहे त्यात प्रवेश वर्मा आणि विजेंद्र गुप्ता यांचा समावेश आहे. त्याच वेळी, अशी बातमी आहे की दिल्लीतून पहिली निवडणूक जिंकणाऱ्या चेहऱ्याचीही मुख्यमंत्रीपदासाठी छाननी केली जात आहे. जर या दृष्टिकोनातून पाहिले तर, मुख्यमंत्रीपदासाठी ज्या नावांची चर्चा होत आहे. त्यात शालीमार बागच्या आमदार रेखा गुप्ता, ग्रेटर कैलाशच्या आमदार शिखा राय, मुस्तफाबादचे आमदार मोहन सिंग बिष्ट, मालवीय नगरचे आमदार सतीश उपाध्याय, जनकपुरीचे आमदार आशिष सूद आणि उत्तम नगर मतदारसंघातून विजयी झालेले पवन शर्मा यांचा समावेश आहे.

-------------

**नवीन तंत्रज्ञान निर्माण करण्यासाठी ठोस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तंत्रज्ञान समजण्यात अपयशी ठरले आहेत. ते 'एआय'वर टेलीप्रॉम्प्टर भाषण देत आहेत. यावेळी आपल्या देशाचे स्पर्धक नवीन तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवत आहेत. भारताला पोकळ घोषणांची नाही तर मजबूत उत्पादन आधाराची आवश्यकता आहे, असे त्यांनी पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करताना म्हटले आहे. ड्रोनने युद्धात क्रांती घडवून आणली आहे, बॅटरी, मोटर्स आणि ऑप्टिक्स एकत्रित करून युद्धभूमीवर अभूतपूर्व कार्य केले जात आहे. मात्र, ड्रोन हे केवळ एक तंत्रज्ञान नाही तर ते एका मजबूत औद्योगिक प्रणालीद्वारे तयार केलेले तळापासून वरपर्यंतचा नवोपक्रम आहे, असे राहुल गांधी म्हणाले. भारतात प्रचंड प्रतिभा, प्रमाण आणि प्रेरणा आहे. आपल्या तरुणांना नोकऱ्या देण्यासाठी आणि भारताला भविष्यात घेऊन जाण्यासाठी आपल्याकडे स्पष्ट दृष्टी असली पाहिजे आणि खऱ्या औद्योगिक कौशल्याची निर्मिती केली पाहिजे, असे राहुल गांधी म्हणाले. काँग्रेस नेत्याने पोस्टसोबत ड्रोन तंत्रज्ञानावरील नऊ मिनिटांचा व्हिडिओ देखील जोडला आहे. ज्यामध्ये म्हटले आहे की भविष्यासाठी असे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी भारताकडे प्रतिभा आणि अभियांत्रिकी कौशल्ये आहेत.

----------------

**वक्फ विधेयक मुस्लिमांविरोधात असल्याची**

वक्फ मालमत्तेचा लाभ मिळाला पाहिजे, अशी केंद्र सरकारची भूमिका आहे. वक्फ दुरुस्ती विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे, असे काही लोक दिशाभूल करत आहेत. आपला देश कायदा, संविधान आणि व्यवस्थेवर चालतो. सरकार किंवा कोणतीही व्यक्ती वक्फ मालमत्तेबरोबर हस्तक्षेप करु शकत नाही.

---------

**महाराष्ट्रात लवकरच लव्ह**

परिस्थितीचा अभ्यास करून लव्ह जिहाद, फसवणूक आणि बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण यावर उपाययोजना सुचवून, इतर राज्यातील कायद्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच कायद्याचा मसूदा तयार करणे तसेच कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्याचे काम ही समिती करणार आहे. दरम्यान, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड सारख्या भाजपशासित राज्यांमध्ये आधीच लव्ह जिहादविरुद्ध कायदे आहेत, तर राजस्थानमध्ये कायद्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

------------

**'छावा' महाराष्ट्रात टॅक्स फ्री करा;**

आणि तितकेच दमदार डायलॉग हे शिवभक्तांचे रक्त सळसळ करणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. महाराष्ट्रभूमीत जन्मलेला या दोन्ही महाराजांनी अखंड हिंदुस्थानचा इतिहास रचला. त्यामुळेच, महाराष्ट्रात हा चित्रपट टॅक्स मुक्त करावा, अशी मागणी होत आहे. त्यातच, आता राज्यातील महायुती सरकारमधील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही ही मागणी केली आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसकडून महाराष्ट्र सरकारला छावा चित्रपटासंदर्भात विनंती करण्यात आली आहे. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनसंघर्षावर आधारित असणारा ''छावा'' चित्रपट टॅक्स फ्री करावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी केली आहे. सूरज चव्हाण यांच्या मागणीनंतर आता इतरही पक्षातील नेते मंडळी छावा चित्रपट टॅक्स फ्री करण्याची मागणी करू शकतात.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. १६ फेब्रुवारी २०२५



## ह.भ.प.अशोक बळे महाराज यांचे हृदयविकाराने निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पारगांव बळेवाडी येथील भागवताचार्य ह.भ.प.अशोक महाराज बळे (वय ५० ) यांचे काल शुक्रवारी सायंकाळी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले.गेली ४० वर्षपासुन अध्यात्मिक क्षेत्रात गायन क्षेत्रात व हरिनाम सप्ताहात एक नामांकीत कीर्तनकार,



प्रवचनकार,शास्त्रीय गायक म्हणून ओळखले जत आहेत.महाराष्ट्रातीलशेकडो कीर्तनकारांना कीर्तनात साथ संगत दिली. त्यांच्या आवाजात एक वेगळीच जादु होती. अशोक महाराज बळे हे वारकरी संप्रदायातील हिरा होते त्यांच्या जाण्याने वारकरी संप्रदायातील व गायन क्षेत्रातील गोड आवाज काळच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्यापाठीमागे पत्नी,आई वडील,

भाऊ,दोन मुले, भागवताचार्य ह.भ.प.अमोल महाराज बळे (भोसले) हे चिरंजीव आहेत. अंत्यविधी बळेवाडी येथील त्यांच्या शेतात रात्री झाला. यावेळी जि.प.चे माजी सदस्य देवीदास धस, चिंचपुरचे सरपंच सतीष ढवळे, सामाजिक, राजकीय,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आजची स्त्री अबला नसून सबला -श्रीमती सुरेखा खेडकर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या अंतर्गत तक्रार निवारण (महिला) समितीच्या वतीने दि. १३ फेब्रुवारी २०२५, गुरुवार रोजी कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण-'महिला सुरक्षितता' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्र. प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या आणि सहशिक्षिका श्रीमती सुरेखा खेडकर, सहशिक्षिका श्रीमती संध्या टेकाळे ह्या होत्या. तर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची व्यासपीठावर उपस्थित होती. सर्वप्रथम मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. ज्योती रकटे यांनी केले. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण आणि महिला सुरक्षितता राहण्यासाठी वेळोवेळी महाविद्यालयाच्यावतीने अशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते असे त्या म्हणाल्या.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण आणि कायदे या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या आणि सहशिक्षिका श्रीमती सुरेखा खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती सुरेखा खेडकर म्हणाल्या कि, 'स्त्री जन्मा तुझी कहाणी, ओठी हासू आणि नयनी पाणी, कर्तृत्व सिद्धता हे स्वप्न मनी, कर्तव्यपूर्ती ठेवी सदा ध्यानी, तरीही मनी एक प्रश्न रुतुनी, स्त्री सुरक्षितता आहे का जनी' आजच्या धकाधकीच्या जीवनात महिलांची



### जयभवानी महाविद्यालयात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण

### 'महिला सुरक्षितता'या विषयावर अंतर्गत तक्रार निवारण समितीच्यावतीने एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

सुरक्षितता ही एक गंभीर समस्या बनली आहे. घराबाहेर काम करणाऱ्या महिलांपासून विद्यार्थिनींपर्यंत सर्वच स्तरांवरील महिला विविध धोक्यांना सामोरे जात आहेत. रस्त्यावर, कामाच्या ठिकाणी, ऑनलाईन आणि अगदी घरातही महिलांना छेडछाड, लैंगिक शोषण, हिंसा याचा सामना करावा लागतो. कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही प्रत्येक संस्थेची आणि समाजाची जबाबदारी आहे. त्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालयात, कामाच्या ठिकाणी 'अंतर्गत तक्रार निवारण (महिला) कक्षाची स्थापना करण्यात यावी. महिलांना सुरक्षित आणि सन्मानपूर्वक काम करण्याचे स्वातंत्र्य मिळावे यासाठी भारतात विविध कायदे आणि नियम लागू करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी भारत सरकारने ''लैंगिक छळापासून महिलांचे संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३'' लागू केला आहे. हा कायदा ( ) म्हणून ओळखला जातो. पोलीस मदत मिळण्यासाठी १००, १०३, १०९१ क्रमांकांच्या हेल्पलाईन जारी करण्यात आल्या आहेत. महिलांवरील अत्याचाराच्या जलद न्यायासाठी, महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांसाठी न्यायदान प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये, ८६ जलदगती न्यायालये कार्यरत आहेत. अत्याचार व पोक्सो कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरित निकाली काढण्यासाठी २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्यांतर्गत एक विशेष न्यायालयदेखील कार्यरत आहे. हेल्पलाइन आणि सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण सुरू केले असले तरी अजूनही समाजात मानसिकता बदलण्याची गरज आहे. आजची स्त्री अबला नसून सबला आहे असे त्या म्हणाल्या.

त्यानंतर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक म्हणाले कि, -'महिला सुरक्षितता आणि कायदे' यावरती आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्राचार्य सोमनाथ घाडगे म्हणाले कि, 'तुझ्या उतुंग भरारीपुढे, गगनही ठेंगणे भासावे, तुझ्या विशाल पंखाखाली, विश्व हे सारे वसावे' जगाच्या इतिहासात स्त्रीचा दुर्दम्य आशावाद आणि परिस्थितीशी झुंजण्याच्या अजोड बळाच्या जोरावर आज ती सर्व क्षेत्रात आघाडीवरती आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्री उभी आहे. आर्थिक स्वातंत्र्य अनुभवायला शिकली आहे. तिच्या गुणांना, मतांना घरात आणि समाजातही किंमत आहे. विविध क्षेत्रे तिने पादक्रांत केली. स्त्रीची सुरक्षितता हा जरी नाजूक मुद्दा असला तरी आत्मविश्वासाने आज ती व्यक्त होत आहे. काही लोकांच्या वाईट मानसिकतेमुळे संपूर्ण समाजाला त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी प्रत्येकाने मुलांना लहानपणापासूनच महिलांचा सन्मान करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ लोखंडे बी. बी. यांनी केले. तर आभार सहशिक्षिका श्रीमती रुपाली मंगरुळे यांनी मानले. या कार्यशाळेला बहुसंख्य महिलांनी प्रतिसाद दिला तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थीनिनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# संविधान गौरव वक्तृत्व स्पर्धेत रुईया महाविद्यालयाची सलोनी राणे प्रथम!

मुंबई । प्रतिनिधी

वांद्रे, मुंबई स्थित चेतना महाविद्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन संविधान गौरव वक्तृत्व स्पर्धेत माटुंग्याच्या रुईया महाविद्यालयाची कु. सलोनी सतीश राणे हिने प्रथम पारितोषिक पटकावून प्रतिष्ठेचा फिरता चषक पटकावला आहे. तर कल्याणच्या बिरला महाविद्यालयाची कु. अनुष्का अरुणेश मिश्रा हिने दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. चर्चगेट, मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयाच्या कु. अतुल आत्माराम लोंढे याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

रुपारेल महाविद्यालयाची कु. संचिता संपत चिकणे, पाटकर महाविद्यालयाची कु. सुप्रिया अजय खरवार व भाईंदरच्या अभिनव महाविद्यालयाची कु. शीतल राजेंद्रसिंह महर यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली आहेत. जागतिक युद्धजन्य परिस्थिती आणि भारताचे परराष्ट्र धोरण, एक देश एक निवडणूक धोरण कितपत व्यवहार्य व सरकारच्या



मोफत योजना आणि वाढती बेकारी या विषयांवर तरुणाईची मतं जाणून घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत स्पर्धक विद्यार्थ्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केली.

केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे माजी सहआयुक्त डॉ. प्रभाकर रोकडे व एमएमपी शहा महाविद्यालयाच्या प्रा. सुप्रिया शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिलेल्या या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयातील तीस स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेअंती झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हासोबत रोख रक्कम व प्रमाणपत्र देतानाच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांनाही प्रमाणपत्रे देण्यात आली.

चेतना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय जगताप उपप्राचार्य प्रा. गिरीश साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष प्रा. आनंद देवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. कैलाश लांडगे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. गजानन डोंगरे यांनी केले तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. हेमंत कांबळे यांनी आभारप्रदर्शन केले. प्रा. डॉ. तनुजा कोळी, प्रा. चंद्रकांत चिकणे यांच्यासह अध्यासनाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी घेतलेले परिश्रम व चेतना महाविद्यालयाच्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे कार्यक्रम कमालीचा यशस्वी झाला.


## विद्यार्थ्यांनी परीक्षेला जाताना मनोधैर्य ठेवावे -माजी शिक्षणाधिकारी ल.ना.देशपांडे

माजलगाव । प्रतिनिधी

श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात इयत्ता १०वी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व शुभेच्छा कार्यक्रम दि १५ फेब्रुवारी शनिवार रोजी दुपारी ३:३० वाजता संपन्न झाला.या कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सरस्वती माता यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

या प्रसंगी व्यासपीठावर सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,अमरनाथ खुर्पे,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भा.शि.प्र.संस्था,ॲड विश्वास जोशी,कार्यवाह स्थानिक समन्वय समिती सिध्देश्वर शैक्षणिक संकुल,प्रशांत भानप,अध्यक्ष माध्यमिक शालेय समिती.ल.ना.देशपांडे माजी शिक्षण अधिकारी,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे ,सदाशिव ढगे,कमलाकर झोडगे,परमेश्वर आदमाने

इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक १० वी विभागप्रमुख प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर,यांनी केले.अमोल ठाकुर यांनी प्रमुख व्यासपीठावरील मान्यवरांचा परिचय करून दिला.



कु.श्रावणी सोळंके,कु.कार्तिकी कुरे,अजिंक्य लाटे,चि. पार्थ नागरगोजे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले श्रीमती सुनंदा खांडेकर,व आदिनाथ कुंडकर यांनी मनोगत व्यक्त केले. उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रशांत भानप म्हणाले आजचा दिवस सुवर्ण काळ आहे.आजच्या दिवसाला अनन्यसाधारण महत्व आहे. अविस्मरणीय असा हा काळ आहे.विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांनी दिलेली ज्ञान रुपी शिदोरी जीवनरुपी प्रवासात जवळ ठेवावी. ल.ना.देशपांडे माजी शिक्षणाधिकारी,म्हणाले विद्यार्थ्यांनी परीक्षा ची पूर्व तयारी करताना आपली मानसिकता चांगली ठेवावी,चेहरा प्रसन्न ठेवावा,प्रश्नपत्रिका हातात पडताच तीन वेळा वाचावी, तनाव वाढला की, दुसरा प्रश्न सोडवावा,प्रश्न पत्रिका सोडवल्या नंतर किती गुणांची प्रश्नपत्रिका सोडविली हे कोणालाच सांगु नका.परीक्षा देताना इतरांपासून दक्ष रहा व गैरमार्ग टाळा.अध्यक्षीय समारोप करताना अमरनाथ खुर्पे म्हणाले की,तुमच अस्तित्व निर्माण करण्यासाठी इयत्ता ११ वी आणि १२ वी ही एक प्रयोग शाळाच असेल.या दोन वर्षात तुम्ही स्वतः ला सिद्ध करा.या शाळेने दिलेले संस्कार ही तुम्हाला आयुष्यभर पुरणाची शिदोरी आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी,यांचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती वैशाली फूलसे यांनी केले.स्वप्ना देशपांडे यांनी आभार मानले व प्रभाकर बनसोडे यांनी सांगितलेल्या कल्याण मंत्राने कार्यक्रम संपन्न झाला.

## सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती लोणी यांच्या वतीने शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील सय्यदमिर लोणी येथे संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या सार्वजानिक शिवजयंती उत्सव (वर्ष ११ वे) यांच्यावतीने शिवजयंतीनिमित्त सप्ताहभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा जागर करणाऱ्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.**

त्यामुळे पंचक्रोशीतील अनेक शिवप्रेमी नागरिक उपस्थीत राहणार आहेत, शिवज्योत बात्रा अन्? मिरवणूक दि १८ फेब्रुवारी रोजी गावतील सर्व उत्साही तरुण शिवप्रेमी नागरिक व तरुण वर्ग किल्ले शिवनेरी या ठिकाणी शिवज्योत आणण्यासाठी जातात. ब दि १९ फेब्रुवारी रोजी मुख्य जयंती सो हळा असतो. शिवज्योत आणण्यासाठी गेलेले सर्व शिवप्रेमी तरुण व उत्साही कार्यकर्ते दि १९ फेब्रुवारी रोजी मुख्य गावाच्या प्रवेशद्वारासमोर हजर होतात. व त्या ठिकाणी गावातील सर्व माता-भगिनी व सर्व गावकरी शिवज्योत आणण्यासाठी गेलेल्या सर्व शिवप्रेमी तरुणांचे उत्साहात स्वागत करतात, त्यानंतर संपूर्ण गावात शिवज्योत मिरवणूक काढली जाते विविध सांस्कृतिक कार्यक्रम लेझिमच्या आवाजात पोवाडा लावून हा कार्यक्रम साजरा केला जातो. विद्यार्थ्यांच्या शालेय कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम दि १९ फेब्रुवारी रोजी मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्या उपजत कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी जयंती समितीने शालेय विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

दि २० फेब्रुवारी रोजी रात्री ठीक ८.३० ते ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासावरील व जीवनावरील मराठी चित्रपटाचे आयोजन करण्यात आले आहे. दि २१ फेब्रुवारी रोजी रात्री ठीक ९ ते ११ यावेळेत ह.भ.प. श्री अक्रूर महाराज साखरे यांचे जाहीर कीर्तन होणार आहे. दि २२ फेब्रुवारी रोजी ठीक ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. श्री. अक्षय महाराज उगले यांची कीर्तन सेवा आयोजित केली आहे. दि २३ फेब्रुवारी रोजी ठीक ९ ते ११ या वेळेमध्ये ह.भ.प श्री. देवळेकर महाराज यांचे कीर्तन सेवा आयोजित केली आहे.दि २४ फेब्रुवारी रोजी ९ ते ११ या वेळेमध्ये श्री. संतोष महाराज पुजारी यांच्या सांस्कृतिक अशा भारुडाचा आयोजित करण्यात आला आहे. दि २५ फेब्रुवारी रोजी ९ ते ११ या वेळेमध्ये ह.भ.प. सानप महाराज यांचे जाहीर किर्तन होणार आहे. च त्यानंतर महाप्रसादाचा भव्य असा कार्यक्रम होणार आहे महाप्रस- ादाचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण जिल्हा परिषद गटातील व महाराष्ट्रातील शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आमंत्रण आयोजक संयोजकांनी दिले आहे. व छत्रपती शिवाजी महाराज हे आपणा सर्वांचे अस्मितेचे आणि अभिमानाचे प्रतीक आहे. हा जयंती उत्सव शांततेत पार पडण्यासाठी व उत्साहात साजरा करण्याचे नियोजन आहे या उत्सवासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याची काळजी शिवजयंती उत्सव समिती घेणार आहे. तरी सर्व शिवप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन शिवप्रेमी समितीतर्फे करण्यात आले आहे.

# मांजरसुंबा गावचा सुपुत्र आकाश चौधरी याची महसूल सहाय्यकपदी निवड

## महसूल अधिकारी झालेल्या आकाशने वडिलांचे स्वप्न पूर्ण करत श्रद्धांजली अर्पण केली

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील स्व.दिलीप चौधरी यांचे चिरंजीव आकाश चौधरी यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाली मांजरसुंबा गावातून पहिला अधिकारी होण्याचा मान आकाशने मिळवला असल्याने गावातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव व कौतुक होत आहे. आकाश चौधरी यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांनी स्वागत केले. स्पर्धा परीक्षा आणि त्यासाठीची तयारी ही सामान्यतः



कठीण आणि आव्हानात्मक असते. मात्र, अनेक अडचणींवर मात करून आकाश चौधरी याने यश संपादन केले व आपल्या वडिलांचं स्वप्न पूर्ण करत वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. या यशाबद्दल मांजरसुंबा गावासह संपूर्ण बीड जिल्ह्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तुकाराम महाराज म्हणतात तस शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे जिद्द, संघर्षाची तयारी आणि त्याला अभ्यासाची जोड असेल तर कुठल्याही परिस्थितीवर मात करता येते अनेक वर्षापासून शांतपणे केलेल्या अभ्यासाची ही सगळी फलश्रुती मिळाल्याची भावना व वडिलांचं स्वप्न पूर्ण केल्याने वडिलांच्या आठवणीने अश्रू अनावर होत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आकाशने सांगितले.

### आकाशने गावाची मान उंचावली

खुप कमी वयात बाप नावाचं छत्र सोडून गेल्यावर वयाच्या विशीत बाप जान काय असतं हे अनुभवताना आकाशच्या खांद्यावर कुटुंबाची जबाबदारी येत होती अंत्यसंस्कार झाल्यावर दहावा अन्? तेरावा या तेरा दिवसात वयाच्या २० व्या वर्षी आकाशला आलेलं शहाणपण अन्? वडिलांचं स्वप्न पूर्ण करूनच त्यांना श्रद्धांजली अर्पण करायची ही जिद्द मनाशी बाळगून बापाचं दुःख सोबत घेऊन आईला प्रॉमिस करून दोन पायावर जिल्ह्याच्या ठिकाणी अभ्यास करण्यासाठी गेलेला आकाश घरची जबाबदार अन्? जबाबदारी पार पाडत वडिलांनी पाहिलेल्या स्वप्नांना पूर्ण करत एम पी एस सी परीक्षा पास होत महसुलच्या सहाय्यक पदी विराजमान झाला अन्? बापाचं स्वप्न पूर्ण करत मांजरसुंबा गावचा पहिला अधिकारी होण्याचा मान मिळवत गावाची मान उंचवल्याची भावना असे उद्गार गावकऱ्या कडून होत आहेत.

पान ६ वरुन...

### लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या

पिंपळवंडी यांना जोडणारा रस्ता पॅटर्न हा मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत खराब व धोकेदायक झालेला आहे.या रस्ता कामाचे उद्घाटन दि.२२ जुलै २०२२ रोजी मोठ्या थाटामाटात झाले आहे. या मार्गावरून पहिली ते बारावीपर्यंतचे जवळपास १०० ते १५० विद्यार्थी जीव धोक्यात घालून दररोज जीवघेणा प्रवास करतात.परिसरातील बहुतांश वाहतूक याच मार्गाने होते.अबाल वृद्ध नागरिक याच रस्त्याने ये -जा करत असताना गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्याचबरोबर अंमळनेर व परिसर यांना पाटोदा व जामखेड या तालुक्यानां जोडणारा हाच मार्ग.प्रशासन व संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी जनतेतून होत आहे.

### अन्नत्याग आंदोलन निमित्ताने

लोकांना सहभागी करून घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले. नगर परिषदेच्या परिसरातील पत्रकार कक्ष येथे आयोजित करण्यात आलेल्या किसान पुत्रांच्या बैठकीत यावेळी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी अनिरुद्ध चौसाळकर, किरण देशमुख, अनिकेत डिघोळकर, दत्ता वालेकर, रेखा देशमुख , सुभाष बाहेती, प्रा. पंडीत कराड यांनी विविध सुचना केल्या. या बैठकीत अन्नत्याग आंदोलन अधिक लोकांपर्यंत पोहंचावे यासाठी किसान पुत्र आंदोलन च्या वतीने काढण्यात आलेल्या पत्रकाचे विमोचन करण्यात येवून ही पत्रके अधिकाधीक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. या बैठकीचे प्रास्ताविक अनिरुद्ध चौसाळकर यांनी केले तर आभार अनिकेत डिघोळकर यांनी मानले.

### वाढत्या अपेक्षांनी

कॅम्पस इंटरव्ह्यूमधून त्यांची निवड होते. हे फक्त मुलीच्याच बाबतीत घडते असे नाही, तर मुलांचीही निवड होते. यामुळे मुले आणि मुलींच्याही अपेक्षा वाढल्या आहेत. मुलगी मुलापेक्षा दिसायला डावी असेल, पगार कमी असेल किंवा अन्य अपेक्षांच्या तुलनेत थोडी कमी असेल तर चालते; पण मुलाच्या बाबतीत ही सूट नाही.

शेतकरी मुलगा, एकत्रित कुटुंब नको म्हणतात

मुलगा सर्वसामान्य कुटुंबातला आणि शेतकरी असेल, तर त्याचे लग्न जुळणे जास्तच अवघड आहे. मुलगा नोकरदार किवा व्यावसायिक असावा, अशीच अपेक्षा असते. शेतकरी असू नये पण गावाकडे शेती असावी, अशी अटअसते.एकत्रित कुटुंबात एकांत राहत नाही. भरपूर कामे करावी लागतात. त्यामुळे एकत्रित कुटुंब नको, अशीही मुलीची मानसिकता आहे.

### विद्यार्थ्यांनो संशोधक होण्यासाठी

यांनी व्यक्त केले. आपण आत्मसात केलेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करून समाजाच्या दृष्टीने विधायक काम करीत राहणे हा बुद्धिमत्तेचा सरळ अर्थ आहे असे म्हणत विद्यार्थ्यांनी आपली बुद्धिमत्ता स्वतःच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासाकरिता वापरावी असे आवाहनही डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी बोलताना अध्यक्ष सी.एल.बर्दापूरकर यांनी योगेश्वरी महाविद्यालयाने अनेक गुणवंत विद्यार्थी घडवले आहेत. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर योगेश्वरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपला नांवलौकिक केलेला आहे. विद्यार्थ्यांनी सजग राहून आपल्याला त्या विषयांमधले काय येते आणि काय नाही याचा अभ्यास करून आपल्या शिक्षकांमार्फत त्या विषयामधले उत्तम ज्ञान घेण्याचा प्रयत्न करावा. आपल्या ज्ञानाचा समाजाच्या उन्नतीसाठी, राष्ट्र उभारणीसाठी प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी या परिषदेत सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच या परिषदेत आपले पेपर प्रकाशित करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या परिषदेत घेण्यात आलेल्या पोस्टर आणि संशोधन मॉडेल स्पर्धेत विजेत्या प्राप्त विद्यार्थ्यांनाही मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर, उपप्राचार्य डॉ.आर.व्ही.कुलकर्णी, डॉ.वाय.एस.हंडीबाग यांनी ही राष्ट्रीय पातळीवरील परिषद यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ए.एस.कदम तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांनी केले.

### अविनाश क्षीरसागर आत्महत्या

प्रकरणात गुन्हा दाखल होतच काँग्रेस अनु. जाती विभागचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी आरोपीना तात्काळ अटक करण्यात यावी अन्यथा पिडीत कुटुंबासह तीव्र आंदोलन करू असा इशारा दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रशासनास दिला आहे. सदरील घटनेत सुधारित कायद्या अंतर्गत कलम १०८, ११५(२), ३५२, व अनु. जाती अनु. जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(२), ३(), ३(१)() नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास करण्यास सुरुवात झाली आहे. सदरील प्रकरणात काँग्रेस नेते दत्ता कांबळे सह, राजेभाऊ खंडागळे, धम्मानणंद साळवे, अनिल कांबळे सह कार्यकर्त्यांनी गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न केले.

cmyk

# उन्हाच्या तडाख्यात स्ट्रॉबेरीचा यशस्वी प्रयोग

## साताऱ्याचा शेतकरी महिन्याकाठी कमवतोय १.५ लाखाहून अधिक!

महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातल्या तरुण शेतकऱ्याने कडक उन्हाळ्याच्या तडाख्यात स्ट्रॉबेरीचं उत्पादन घेत दीड एकर जमिनीवर दरमहा स्ट्रॉबेरीला १.५ते २ लाखांचं उत्पन्न मिळवलंय. पाणी, खतांचा योग्य वापर आणि कीटक आणि कीटकांपासून वेळेवर प्रतिबंधात्मक उपायांमुळे, लाल स्ट्रॉबेरीची लागवड ( ) चांगली केलीय. सागर रघुनाथ माने असं या शेतकऱ्याचं नाव असून पुणे, वाशी, सांगली, कोल्हापूर, विटा, सातारा आणि कराड येथे स्ट्रॉबेरीची चांगली मागणी आहे. या तरुण शेतकऱ्याने उष्ण हवामान असलेल्या कोरड्या भागात स्ट्रॉबेरी लागवडीचा यशस्वी प्रयोग केला.शेतकरी सागर रघुनाथ माने या तरुण शेतकऱ्याने थंड हवामानात पिकवल्या जाणाऱ्या स्ट्रॉबेरी उष्ण हवामानात वाढवण्याचे आव्हान होते. तो म्हणतो हे एक मोठे आव्हान होते.तज्ञ शेतकऱ्यांशी, कृषी तज्ञांशी चर्चा करत गेल्या काही वर्षांपासून स्ट्रॉबेरीची लागवड करत चांगलं उत्पन्न कमावलंय. पहिल्याच प्रयत्नात यश मिळल्याने या शेतकऱ्याचा आत्मविश्वास वाढलाय. ''शेतीमध्ये प्रयोगशील राहिलं तर यश नक्की मिळतं. कोरड्या भागातही आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य व्यवस्थापनामुळे चांगलं उत्पादन घेता येतं,'' असं सागर माने सांगतात. त्यांच्या यशोगाथेने कोरडवाहू भागातील अनेक शेतकऱ्यांना नवी दिशा दिली आहे.





पहिल्याच प्रयत्नात यश : सप्टेंबर-ऑक्टोबर २०२३ मध्ये त्यांनी केवळ २० गुंठे जमिनीवर प्रायोगिक तत्त्वावर स्ट्रॉबेरीची लागवड केली. किसानतकला दिलेल्या माहितीनुसार, योग्य नियोजन, खतांचा संतुलित वापर आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ९० दिवसांतच पहिलं उत्पादन हाती आलं. हा प्रयोग यशस्वी झाल्यावर, त्यांनी २०२४मध्ये ६० गुंठे क्षेत्रावर स्ट्रॉबेरीची लागवड वाढवल्याचं ते सांगतात. पिकाचे व्यवस्थापन आणि उत्पन्न : स्ट्रॉबेरी लागवडीसाठी पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचं असतं. ठिबक सिंचन पद्धती, सेंद्रिय खतांचा वापर आणि कीटक व्यवस्थापनाच्या योग्य उपाययोजनांमुळे उत्पादनात सातत्य राखलं. पुणे, सांगली, कोल्हापूर, विटा, सातारा येथे स्ट्रॉबेरीला मोठी मागणी आहे. सध्या ३००ते ३५०रुपये प्रतिकिलो दराने विक्री होत असून, महिन्याला २.५ते ३ लाख रुपयांचं उत्पन्न मिळत आहे. सागर माने यांच्या या यशस्वी प्रयोगामुळे गावातील आठ जणांना रोजगार मिळाला आहे. दर दोन दिवसांनी स्ट्रॉबेरी तोडणी आणि पॅकिंग केलं जातं, त्यामुळे स्थानिकांना नियमित काम मिळत आहे. भविष्यात उत्पादन वाढवण्याचा आणि प्रक्रिया उद्योग सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६५९ : पहिला धनादेश ब्रिटीश बँकेतून काढण्यात आला, तो नॅशनल वेस्टमिन्स्टर बँकेत जपून ठेवण्यात आला आहे.
१७०४ : औरंगजेबाने राजगड जिंकून त्याचे नाव नबीशाहगड असे ठेवले.
१९१८ : लिथुएनियाने (रशिया व जर्मनीपासून) स्वातंत्र्य जाहीर केले.
१९५९ : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या अध्यक्षपदी
१९६० : अमेरिकी अणुपाणबुडी ट्रायटन ने पाण्याखालून पृथ्वी प्रदक्षिणा करण्यास प्रस्थान केले.
१९६९ : मिर्झा गालिब यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्ताने डाक तिकीट जारी केल्या गेले.
१९८५ : लेबनॉनमध्ये हिजबोल्ला या कट्टरपंथीय शिया मुस्लिम संघटनेची स्थापना.
१९८२ : कोलकत्ता येथे जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.
२००८ : प्रसिद्ध गायक नितीन मुकेश यांना मध्य प्रदेश सरकार कडून लता मंगेशकर पुरस्कार देण्यात आला.
२००८ : बिहार च्या नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री कन्या विवाह योजनेचे उद्घाटन करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२२ : जपानमधील निचिरेन बौद्ध पंथाचे स्थापक निचिरेन यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १२८२)
१७४५ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव पेशवे - मराठा साम्राज्यातील ४ था पेशवा, १६ व्या वर्षी पेशवेपदावर विराजमान झालेला अत्यंत कर्तबगार पेशवा. पानिपतच्या युध्दानंतर विस्कटलेली मराठेशाहीची घडी त्यांनी बसविली. (मृत्यू: १८ नोव्हेंबर १७७२)
१८२२ : बोटांचे ठसे, रंगांधळेपणा आणि स्त्रियांच्या सौंदर्यावर संशोधन करणाऱ्या सर फ्रान्सिस गाल्टन यांचा जन्म.
१८७६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे - भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (मृत्यू: ६ मे १९६६)
१९०९ : मॅकडोनाल्ड चे सहसंस्थास्थापक रिचर्ड मॅकडोनाल्ड यांचा जन्म. (मृत्यू: १४ जुलै १९९८)
१९२० : प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेता आई.एस. जोहर यांचा जन्म.
१९४१ : उत्तर कोरिया चे माजी प्रशासक किंम जोंग इल यांचा जन्म.
१९४८ : भारतीय चित्रपट कलाकार हैदर अली यांचा जन्म.
१९५४ : मायकेल होल्डिंग - वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू
१९६१ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध गायक शेखर सेन यांचा जन्म.
१९६४ : बेबेटो - ब्राझीलचा फुटबॉलपटू
१९७७ : प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपट अभिनेता दर्शन थुगुडीपा यांचा जन्म.
१९७८ : वासिम जाफर - भारतीय क्रिकेटपटू.
१९९७ : प्रसिद्ध कब्बडी प्लेयर परदीप नरवाल चा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४४ : धुंडिराज गोविंद ऊर्फ 'दादासाहेब' फाळके - भारतीय चित्रपट उद्योगाचे जनक, लेखक, छायाचित्रकार, दिग्दर्शक, संकलक, वेशभूषाकार, कलादिग्दर्शक इ. अनेक जबाबदार्या ते सांभाळत असत. (जन्म: ३० एप्रिल १८७० त्र्यंबकेश्वर, नाशिक, महाराष्ट्र)
१९५६ : मेघनाद साहा - खगोलभौतिकशास्त्रज्ञ व संसदसदस्य. तार्यांच्या वातावरणाचे तापमान आणि आयनीभवन यांचा संबंध स्पष्ट करणारा सिद्धांत त्यांनी मांडला. भारताचे स्वत:चे राष्ट्रीय पंचांग त्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले. (जन्म: ६ आक्टोबर १८९३)
१९६८ : नारायणराव सोपानराव बोरावके - कृषी शिरोमणी, पहिले मराठी साखर कारखानदार, पुणे, सोलापूर व नगर जिल्ह्यांत अनेक संस्था व उद्योग त्यांनी उभे केले. संशोधित फळांच्या उत्पादनास त्यांनी प्रोत्साहन दिले. १९३३ मध्ये त्यांना 'रावसाहेब' तर १९४६ मध्ये त्यांना 'रावबहादूर' हे किताब मिळाले. शेतीच्या आधुनिकीकरणावर त्यांनी भर दिला. (जन्म: १७ ऑक्टोबर १८९२)
१९९४ : पं. निवृत्तीबुवा सरनाईक - जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक (जन्म: ४ जुलै १९१२)
१९९६ : आर. डी. आगा - उद्योगपती, थरमॅक्स उद्योगसमुहाचे संस्थापक.
२००० : बेल्लारी शामण्णा केशवन - आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथालयशास्त्रज्ञ, पद्मश्री, 'इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर'चे पहिले संचालक.
२००१ : रंजन साळवी 'पिंजरा', 'सवाल माझा ऐका', 'केला इशारा जाता जाता' आदी मराठी चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शक.



## हिरवळीच्या पिकांचे फायदे

हिरवळीची पिके जमिनीत गाडल्यावर सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते. त्यामुळे जमिनीतील उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची संख्या व वाढ चांगली होते आणि जैविक गुणधर्मांची सुधारणा होते. हिरवळीची पिके जमिनीच्या खालच्या थरातून अनद्रव्ये शोषून घेतात आणि ही पिके गाडल्यांतर अनद्रव्यांची उपलब्धता वरच्या थरात वाढते.

हिरवळीची पिके द्विदलवर्गीय असल्यास हवेतील नत्र जमिनीत स्थिरीकरण करण्यास मदत होते. उथळ/ हलक्या जमिनीची जलधारणशक्ती वाढते आणि रासायिाक खतातील पाण्याद्वारे वाहून जाणाऱ्या अनद्रव्यांचा ऱ्हास कमी होतो. भारी काळ्या, खोल जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा चांगला होऊन वाफसा स्थिती लवकर येते. हिरवळीच्या खतामुळे कठीण घडण झालेल्या जमिनीची घडण सुधारते, तसेच घनता कमी होऊन हवा खेळती राहते. पावसाच्या पाण्यामुळे होणारी मातीची धुप जमिनीची सरंचना सुधारल्यामुळे कमी होते. क्षारयुक्त जमिनीतील विरघळणारे विद्राव्य क्षार निचरा सुधारल्यामुळे कमी होतात त्यामुळे पिकांची वाढ चांगली होते. हिरवळीच्या पिकांची वाढ जोमदार व जलद असल्यामुळे त्यामध्ये तणे वाढू शकत नाहीत. धैंचासारखे हिरवळीचे पीक चोपण जमिनीत चांगल्या प्रकारे वाढत असल्याो चोपण जमिनी सुधारण्यासाठी जिप्समसारख्या भूसुधारकेबरोबर धैंचा पीक जमिीत गाडावे. अशाप्रकारे जमिीची सुपिकता टिकविण्यासाठी आणि जमिनीचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी दोन ते तीन वर्षांतून एकदा तरी हिरवळीचे पिके जमिनीत गाडावीत व त्याानुसार पिक पध्दतीमध्ये हिरवळींच्या पिकांचा अंतर्भाव करावा. यामुळे सेंद्रिय खतावरील खर्च कमी होऊन जमिनीत टाकलेल्या रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढेल, जमिीची जैविक सुपीकता वाढेल आणि शेती उत्पादन आर्थिकदृष्ट्या फायद्याचे होईल.

## उन्हाळी मूग लागवड तंत्रज्ञान

सध्या दरवर्षी मुगाची मागणी बाजारपेठेत चांगली असून भावही चांगले मिळत आहे. त्यामुळे उन्हाळ्यात मूग लागवड करण्याकडे बऱ्याच जणांचा कल दिसून येत आहे. उन्हाळ्यामध्ये देखील मुगाची लागवड केली तर भरपूर उत्पादन मिळू शकते. उन्हाळ्यामध्ये स्वच्छ सूर्यप्रकाश व हवामान उष्ण असल्यामुळे मूग पीक चांगले प्रकारे येऊ शकते. उन्हाळ्या मधील मूग लागवडीचा सगळ्यात जास्त महत्त्वाचा फायदा म्हणजे किडींचा व रोगांचा प्रादुर्भाव फार कमी प्रमाणात होतो. जर सिंचनाची सुविधा उपलब्ध असेल तर मुगाचे चांगले उत्पादन उन्हाळ्यात मिळू शकते.

जमीन : मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारी जमीन निवडावी. पाणथळ, क्षारपड, चोपण तसेच उताऱ्यावरील हलक्या जमीनीवर मुगाची लागवड करू नये.

साधारणतः ६.५-७.५ सामू असलेली जमीन या पिकाला योग्य असते.

पूर्वमशागत : रब्बी पिकाची काढणी नंतर जमिनीवर पडलेले अवशेष, पालापाचोळा वेचून जमीन स्वच्छ करावी. जमिनीची खोल नांगरट नंतर कुळवच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवाच्या पाळी देतांना ५-१० टन चांगले कुजलेले शेणखत द्यावे.

पेरणीची वेळ आणि पद्धती : उन्हाळी मुगाची पेरणी २० फेब्रुवारी ते १५ मार्च या दरम्यान करावी. उशिरा पेरणी केल्यास हे पीक पावसात सापडण्याची शक्यता असते. पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. पेरणी करताना दोन ओळींत ३० सेंमी आणि दोन रोपांत १० सेंमी. ठेवावे. हेक्टरी १५-२० किलो बियाणे वापरावे. घरचे बियाणे असल्यास दर ३ वर्षांनी बदलावे.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी २.५ ग्रॅम थायरम किंवा २.५ ग्रॅम कार्बेन्डाझीम प्रती किलो या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. तसेच उगवण चांगली होण्यासाठी आणि रोप अवस्थेतील बुरशीजन्य रोगापासुन संरक्षणासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर जीवाणू संवर्धक रायझोबियम व स्फुरद विरघळवणारे पीएसबी २५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास वापरावे. ट्रायकोडर्मामुळे बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण होते. रायझोबियम मुळे मुळावरील गाठी वाढून नत्राची उपलब्धता वाढते.

खतमात्रा : पेरणीपूर्वी चांगले कुजलेले शेणखत व कंपोस्ट खत हेक्टरी १० टन द्यावे.

पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो नत्र व ४० किलो स्फुरद (४४ किलो युरिया (१ गोणी) व २५० किलो एसएसपी (५ गोणी) किंवा १०० किलो डीएपी द्यावे ) द्यावे. १५-२० किलो एमओपी दिल्यास उत्पादनात वाढ होते.

विद्रांव्या खतांची फवारणी : पीक फुलोऱ्यात असताना २ टक्के युरियाची (२० ग्रॅम प्रती लिटर पाणी) फवारणी करावी. तसेच शेंगा भरत असतांना २ टक्के डीएपीची (२० ग्रॅम डीएपी प्रती लिटर पाणी) फवारणी करावी.

आंतरमशागत : पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी हलकी डवरणी करावी. त्यानंतर गरज भासल्यास १०-१२ दिवसानी परत एखादे खुरपणी करावे. शेक्यतो पेरणी पासून ३०-३५ दिसापर्यंत शेत ताण विहरीत ठेवावे.

पाणी व्यवस्थापन : पेरणीपूर्वी एक पाणी द्यावे व वापस्यावर आल्यानंतर पेरणी करावी. पेरणीनंतर पहिल्यांदा ३-४ दिवसांनी हलकेसे पाणी द्यावे. पहिल्या पाण्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे व पिकाच्या गरजेनुसार पाणी द्यावे. पिकास साधारणपणे ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या संपूर्ण कालावधीत द्याव्यात. विशेषतः पीक फुलोऱ्यात असताना व शेंगा भरताना पाण्याच्या ताण पडू देऊ नये.

काढणी व उत्पादन : मूगाच्या शेंगा ७५ टक्के वाळल्यानंतर पहिली तोडणी व त्यानंतर ८-१० दिवसांनी राहिलेल्या सर्व शेंगा तोडाव्यात. शेंगा खळयावर चांगल्या वाळल्यावर मळणी करावी. साठवणीपूर्वी मूग धान्य ४-५ दिवस चांगले उन्हात वाळवून पोत्यात किंवा कोठीत साठवावे. साठवण कोंदट व ओलसर जागेत करु नये. साठवताना कडूनिंबाचा पाला (५%) धान्यात मिसळावा, त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही. वरील प्रमाणे सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून उन्हाळी मुगाची जातीपरत्वे ४ ते ५ क्विंटल प्रति एकरी उत्पादन मिळू शकते.



## संत्रा शेतीची घ्या संपूर्ण माहिती

संत्रा लागवडीसाठी जमिनीची निवड एक महत्त्वाची प्रक्रिया आहे, ज्यामुळे उत्तम पिकाची निर्मिती संपली पहिली गरजेची आहे. संत्रा बागेच्या दक्षिण-पश्चिम दिशेला जैविक कुंपण करणे हे अत्यंत महत्त्वाचे कारण त्या दिशेची सुरक्षा करताना पिकांसाठी अद्भूत अनुकूल स्थिती मिळते. लागवड करण्यासाठी, पहिल्या टप्प्यात एक हेक्टर क्षेत्र निवडावा, त्यानंतर अर्धा-अर्धा हेक्टरच्या पट्टीत क्षेत्र वाढवावे. या माध्यमाने संत्रा बागेची जोपासना करताना अडचणी येत नाही. लागवड करण्यासाठी निवडलेले क्षेत्र मोठे असल्यास, सलगपणे एकच पट्टा समजून लागवड केली जाते आणि निवडलेल्या क्षेत्राचे आधी १/२ हेक्टर पट्टे वाढवून घ्यावे.

काही भागात निवडलेली जमीन सपाट असते. तेथे सपाटीकरण करण्याची गरज नाही. या बाबीत, उताराची जमीन असल्यास जवळजवळ बांध घालून जमीन सपाट न करता लागवड केली जाते. याची चुकी लक्षात घेतल्यास, प्रत्येक क्षेत्रामध्ये ठराविक उतार राखूनच सपाटीकरण करायला हवे. त्याचबरोबर काही ठिकाणी पाणी साचून राहायला नको यासाठी जमिनीस तिचा मूळचा सुसंगत असा ढाळ (उतार) असावा. हलक्या जमिनीत निचरा चांगला होतो. पण जमिनीतील वरच्या थरातील मातीची धूप होण्याची शक्यता असते आणि खालच्या थरातून मोठ्या प्रमाणात अन्नद्रव्ये झिरपून जाण्याची शक्यता असते. तेव्हा जमिनीचा प्रकार कसाही असो आणि जमिनीचा उतार मूळचा कितीही असो, शास्त्रीय पद्धतीने सपाटीकरण करणे आवश्यक आहे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि उताराच्या प्रमाणाचे अवलोकन करून क्षेत्रामध्ये आणि बाजूने चर काढावेत. इथे वाढलेल्या उच्च औसताने नकारात्मक परिणामांची शक्यता आहे. उतारास समांतर, उतारास आडवे चर खोदून ते एकमेकांशी मिळतील आणि त्यातील पाण्याचा निचरा एका ठिकाणी जमा होईल हे निश्चित करायला मदत करते. बागेभोवती कुंपण असल्याने जनावरांपासून, माणसांच्या वर्दळीपासून संरक्षण होते. याशिवाय, हिवाळ्यातील थंडीची लाट आणि उन्हाळ्यातील उष्ण वारे यांपासून संत्रा पिकाचे संरक्षण होते. संत्रा बागेच्या दक्षिण-पश्चिम दिशेला जैविक कुंपण करणे हे अत्यंत महत्त्वाचे कारण त्या दिशेची सुरक्षा करताना पिकांसाठी अद्भूत अनुकूल स्थिती मिळते. कुंपणाची निवड आणि लागवड करताना कुंपणाचा अपाय संत्रा बागेस आणि शेजाऱ्यांना होणार नाही याची काळजी घ्यावी.



कुंपणासाठी झाडे: बिनकाटेरी झाडे-झुडपे - खडसणी (सुरू), ड्युपिंग अशोका, कडुनिंब, जांभूळ, कण्हेर, मलबेरी, गुलमेहंदी, सिल्व्हर ओक. काटेरी झुडपे - विलायती चिंच, रामकाठी बाभूळ, निवडुंग, बोराटी, बाभूळ, सागरगोटी, चिलार, घायपात, करवंद, बोगनवेल.

हवामान: संत्र्याच्या झाडाची वाढ १३ ते ३७ अंश से. ग्रे. या तापमानाच्या कक्षेत उत्तमरित्या होते. या पिकाला उष्ण व किंचित दमट हवामान, ३७० मि. मी. पाऊस आणि ५० ते ५३ टक्के हवेतील आद्रता चांगली मानवून झाडाची वाढ चांगल्या प्रकारे होते. जमीन : संत्रा लागवडीकरिता योग्य जमीन जमिनीचा पोत - मध्यम काळ्या पोताची. पाण्याचा उत्तम निचरा होणारी एक ते दीड मीटर खोलीची व त्याखाली कच्चा मुरूम असणारी. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ एवढा असावा. चुनखडीचे प्रमाण १० टक्केपेक्षा कमी. पावसाळ्यात पाण्याची पातळी दोन मीटरच्या खाली असावी. जमिनीची क्षारता ०.५ डेसिसायमन/मीटरपर्यंत असावी.

खत व्यवस्थापन : संद्रिय खते फुलोरा येण्याच्या १ ते २ महिने आधी दिली जातात. तर रासायनिक खते फुलोऱ्याच्या अगोदर, फळ पोसत असतांना व जानेवारी-फेब्रुवारी तसेच जुन-जुलै महिन्यात दिली जातात.

## वांग्याला पाणी देताना घ्या काळजी, अन्यथा होईल किडींचा प्रादुर्भाव

सध्याच्या घडीला राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची उन्हाळी वांग्याच्या लागवडीसाठी लगबग सुरु आहे. बाजारात वांग्याला सध्या कमी दर मिळतोय, मात्र कमी दराच्या वेळी लागवड केली की काढणीला दरवाढ होते.

असा अनेक शेतकऱ्यांचा अनुभव असल्याने, दरवाढीच्या आशेपोटी शेतकरी सध्या वांग्याच्या रोपांची लागवड करत आहेत. तशीही वांग्याला बाजारात वर्षभर मागणी असते. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळाल्यास वांग्याच्या लागवडीतून नक्कीच फायदा होतो. वांग्याचे पीक घ्यायचे म्हटले की त्यावर किडीचा प्रादुर्भाव हा सर्वाधिक असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य नियोजन करावे लागते. अन्यथा उत्पादन आणि गुणवत्ता घटून आर्थिक फटका बसतो. मात्र शेतकऱ्यांनी काही गोष्टी केल्यास त्यांना वांग्याच्या पिकातून नक्कीच फायदा होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, पीक लागवड पद्धतीत बदल करावा अर्थात वारंवार एकाच जमिनीत वांग्याची लागवड करू नये. याशिवाय शेतकऱ्यांनी नर्सरीतून रोपे आणताना बियाण्याची माहिती करून खात्रीपूर्वकच रोपे आणावी. किंवा मग फेब्रुवारीच्या लागवडीसाठी बाजारातून खात्रीशीर व शिफारस केलेले बियाणेच खरेदी करून आपल्या स्वतःची रोपे जानेवारी महिन्यातच तयार करावी.

## थोडक्यात




**बीड : श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी जालना रोड वरील श्री संत सेवालाल महाराज चौका मध्ये सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना डॉ. संजय तांदळे, अंकुश राठोड ,अर्जुन चव्हाण, भूषण राठोड, विलास राठोड, बाबासाहेब चव्हाण आदी दिसत आहेत.**

### लिंबारूई येथे गुरूवारपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

राजुरी। प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान लिंबारूई येथे शिवस्वरूप संत नारायणदेव बाबा वाकीकर यांच्या कृपाशिर्वादाने आणि शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२० ते दि.२७ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहातील दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी १ ते ४ संगीत भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकिर्तन होणार असुन यात ह.भ.प.गुरूवर्य महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज श्री क्षेत्र संस्थान नारायणगड, ह.भ.प.विक्रम महाराज सारूक, ह.भ.प.अक्षय महाराज पिंगळे रविवार दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० महाराष्ट्रातील समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर), ह.भ.प.मोहन महाराज रेंगे, ह.भ.प.पांडुरंग महाराज जाधव, ह.भ.प.रामानंद महाराज भारती यांचे किर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता गुरूवार दि.२७ फेब्रुवारी रोजी दुपारी ११ ते १ यावेळेत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे बंकटस्वामी संस्थान नेकनूर यांच्या काल्याच्या किर्तनाने होईल. त्यांनतर महाप्रसाद होईल तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ लिंबारूई यांनी केले आहे.

### जय भारत पदयात्रेचे आयोजन करणार

बीड : छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरी होत आहे. या निमित्ताने केंद्र शासनाने महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्हयामध्ये जय शिवाजी- जय भारत पदयात्रा राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ही जय शिवाजी- जय भारत पदयात्रा ४ ते ५ कि.मी. इतक्या अंतराची आयोजित करुन यामध्ये औद्योगिक प्रतिष्ठाणे, महाविद्यालये, नवउद्योजक, शैक्षणिक संस्था, सांस्कृतीक वारसा जतण करणा-या बाबी तसेच शहरातील व राज्यातील महत्वपूर्ण बाबी यांचे प्रदर्शन होईल असा सर्वकष विचार करुन संदर्भ क्र. ३ नुसार बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळच्या सत्रात पदयात्रेचे आयोजन करण्यात यावे.या अनुषंगाने सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी या पदयात्रेचे आयोजन जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हयातील मान्यवर,सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे,एन जी ओ,एन एस एस,एन वाय के, संस्था व यांच्याशी समन्वय साधून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार पदयात्रेचे आयोजन करण्यात यावे. संबधित अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन जय शिवाजी जय भारत पदयात्रा कार्यक्रमाचे आयोजन करावे असे महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक सेवा सहसंचालक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.



**मुंबई - राज्यातील अल्पसंख्यांकांच्या विषयांवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर आ.सना मलीक, नबील जमा, मार्टी कृती समितीने समस्या मांडल्या. त्यानंतर अल्पसंख्यांक मंत्री दत्ता मामा भरणे, प्रधान सचिव, सचिव व पूर्ण विभागासोबत मंत्रालयातील बैठकीत मुद्दे मांडतांनानबील जमा व मार्टी कृती समिती दिसत आहे.**

### जाहीर प्रगटन

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज २२७/२०२५**

**भास्कर पि. सखाराम बहिरवाळ व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार : १. भास्कर पि. सखाराम बहिरवाळ, वय ६१ वर्षे, धंदा - शेती, २. शहादेव पि. सखाराम बहिरवाळ, वय ४९ वर्षे, धंदा शेती वरील दोघे रा. मंझेरी हवेली, ता.जि. बीड , ३. संगिता भ्र. नवनाथ पवार, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा. जाटदेवळे, जि. अहमदनगर, विरुद्ध निरंक

मागणी- बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सखाराम पि. गोविंदा बहिरवाळ, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत सखाराम पि. गोविंदा बहिरवाळ, यांचा मृत्यु दिनांक ०८/०१/२०२५ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत सखाराम पि. गोविंदा बहिरवाळ, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत सखाराम पि. गोविंदा बहिरवाळ, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५/०३/२०२५ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

(शिक्का)

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन

## लिंबागणेशकर सहभागी होणार :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश। प्रतिनिधी

किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने १९ मार्च रोजी करण्यात येणाऱ्या अन्नत्याग आंदोलनात दरवर्षी प्रमाणेच यावर्षी अंबेजोगाई शहरात सामुहिक उपवास,सहवेदना ,रॅली, व्याख्यान, पुरस्कार वितरण, आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा सन्मान सोहळा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून या सर्व कार्यक्रमात शेकडो किसान पुत्रांनी सहभागी व्हावे असे आवाहन किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब, संयोजक सुदर्शन रापतवार, कालिदास आपेट आदिंनी केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत किसान पुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या पुढाकाराने आज दि. १५ शनिवार रोजी ग्रामपंचायत कार्यालया मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, समीर शेख, रमेश गायकवाड,प्रा.नितिन घोलप, पांडुरंग वाणी,संजय घोलप, आश्रुबा गिरे, विठ्ठल कदम, रामचंद्र मुळे, विनायक मोरे, संतोष भोसले,लहु घोलप, संजय पावले,जीवन मुळे,कचरू निर्मळ आदी उपस्थित होते. किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने देशभरातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते मा.अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने करण्यात येते. १९ मार्च रोजी साहेबराव करपे या शेतकऱ्याने शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या विजेचे बिल भरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून आपल्या कुटुंबासह सामूहिक आत्महत्या केली. या १९ मार्च रोजी या घटनेला ३६ वर्षे पूर्ण होतील. शेतकऱ्यांसाठीचे जाचक ठरणारे शेतकरी विरोधी कायदे रद्द करा या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या किसान पुत्र आंदोलनाने ८ वर्षांपूर्वी १९ मार्च या दिवशी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन ही चळवळ सुरू केली.आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी लिंबागणेश गावातील ग्रामस्थांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले आहे.

### बांधकाम विभागाच्या जुन्या गोडाऊनला आग

जालना/प्रतिनिधी

जालन्यात पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे जुन्या गोडाऊनला आग लावून देण्यात आली अशी माहिती पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री पवार यांनी सांगितले बोलताना ते म्हणाले की त्या गोदाम मध्ये जुना रेकॉर्ड चे गठ्ठे व जुना नवीन सामान होतं सदरील गोदामाला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने आग लावून देण्यात आली असे प्राथमिक अंदाज आहे . तसेच जुने रेकॉर्ड मध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे या कारणावरून जाळले असावे असेही बोलल्या जात आहे. या आगीत गोडाऊन मधील जुने कागदपत्र, टेबल



खुर्चीसह फर्निचर जळून खाक झालंय. अग्निशमन दल घटनास्थळी येऊन मोठ्या प्रमाणात लागलेली आग विजेण्यात आली

दरम्यान या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवित हानी झालेली नाहीये. गोडाऊनमध्ये काही अज्ञात चोरट्यांनी घुसण्याचा प्रयत्न करण्यासाठी गोडाऊनच्या मागील बाजूला एक भलं मोठं भगदाड केलं होतं आणि त्यांनीच गोडाऊन मधील साहित्याला आग लावल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान संबंधित व्यक्तीविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याच्यावर कारवाई करण्यात येईल अशी माहिती पंचायत समिती कार्यालयातील अधिकार्यांनी दिली आहे.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात संत रोहिदास जयंती साजरी




पाटोदा

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १२ फेब्रुवारी रोजी संत रोहिदास यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते संत रोहिदास यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत, प्रोफेसर महादेव काळे, डॉ. पद्माकर ससाणे, प्रा. मनिषा गाढवे, प्रा. विमल अलापुरे, प्रा. भारत बोराडे, डॉ. यादव घोडके, डॉ. दिनेश राऊत आदि उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शरद पवार यांनी केले. आभार डॉ. सोमनाथ लांडगे यांनी मानले.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात संत सेवालाल जयंती व रा. रं. बोराडे यांना श्रद्धांजली



पाटोदा

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १५ फेब्रुवारी रोजी संत सेवालाल यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते संत सेवालाल यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे उपस्थित होते.

जयंती कार्यक्रमानंतर सुप्रसिद्ध साहित्यिक रा. रं. बोराडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी रा. रं. बोराडे यांचे शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील योगदान यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. शरद पवार यांनी केले. आभार डॉ. न. पु. काळे यांनी मानले.

### गांजाची शेती करणाऱ्या व्यक्तीवर घनसावंगी पोलीसांची कारवाई



जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व घनसावंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केतन राठोड यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना व घनसावंगी पोलीस यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे इसमांची माहिती काढुन त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

त्यानुषंगाने दि १३ रोजी गुप्त बातमीदार यांचे मार्फतीन माहिती मिळाली की, मौजे साकळगांव, ता.घनसावंगी शिवारामधील शेतामध्ये इसम भास्कर माणिक माने, रा. साकळगांव, हा त्याचे शेतामध्ये मानवी आरोग्यास हानीकारक असलेला गांजाची शेती करुन स्वत : चे आर्थीक फायद्यासाठी गांजा विक्री करत आहे. मिळाले बातमीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा जालना व घनसावंगी पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी साकळगांव येथे भास्कर माणिक माने याचे शेतावर छापा मारुन त्याच्या गट क्र.१२५, साकळगांव शिवारामधील शेतामध्ये पाहणी केली असता शेतामध्ये गांजाचे एकुण २२ झाडांची लागवड करुन संवर्धन व जोपासना करीत असतांना मिळून आला. त्यामुळे सदर गांजाची २२ झाडांचे पंचासमक्ष वजन केले असता ते ५ किलो ४६४ ग्रॅम असुन किंमत अंदाजे रु.५४६४०/ -असल्याचे दिसुन आल्याने ते तपासकामी जप्त करण्यात आला असुन आरोपी भास्कर माणिक माने याचेविरुध्द पोलीस ठाणे घनसावंगी, जालना येथे सरकारतर्फ पोउपनि, राजेंद्र वाघ यांचे फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड श्री. विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे श्री. पंकज जाधव, घनसावंगी पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख अधिकारी पोनि, श्री. केतन राठोड, पोउपनि राजेंद्र वाघ, गोपाल गोशिक, फुलचंद गव्हाणे, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, देविदास भोजने, सतिश श्रीवास, संदिप चिचोले, रंजित वैराळ, सुनिल वैदय, प्रकाश पवार, धनाजी गवळे, गंगाराम कदम इत्यादींनी केली आहे.

### पंतप्रधान रोजगार निर्मिती अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा

बीड। प्रतिनिधी

खादी व ग्रामोद्योग राज्य कार्यालय महाराष्ट्र राज्य व प्रगती सेवाभावी संस्था पाडळी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञान भवन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी बीड येथे एक दिवशीय जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास खादी व ग्रामोद्योग आयोगाचे अधिकारी श्री अरुण कुमार यादव हे उपस्थित होते. कार्यशाळेत उपस्थित यांना खादी ग्रामोद्योग आयोगाच्या योजनेबाबत श्री अरुण कुमार यादव यांच्याकडून व्यापक प्रमाणात माहिती देण्यात आली. खादी व ग्राम उद्योग आयोग यांच्याकडून बौद्ध घटकातील लाभार्थ्यांकरिता ९० टक्के सबसिडी





योजना त्याचा लाभ जास्तीत जास्त शेतकरी व उद्योजक यांनी घ्यावा असेही कार्यशाळे दरम्यान संबोधित केले तसेच उद्योग व्यवसाय उभारणी करिता पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पस्तीस टक्के सबसिडी योजना पंतरवाळी द्रोण मशीन योजना, मधुमक्षिका पालन योजना, व इतर योजनेबाबत व्यापक प्रमाणात माहिती देण्यात आली व जास्तीत जास्त लोकांनी याचा लाभ घ्यावा असेही यावेळी त्यांनी आवाहन केले.या कार्यक्रमा वेळी ज्ञान भवन स्पर्धा परीक्षेचे संचालक ज्योतीराम घुले प्रगती सेवाभावी संस्थेचे सचिव गणेश आवंतकर उपस्थित होते. संस्थेचे प्रतिनिधी किशोर वाघमारे, अशोक पवार, अशोक इंगळे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले .

# ऐतिहासिक कारंजा टॉवर मध्ये तक्रार निवारण केंद्र सुरु करा

## तीन बाजूने वयोवृद्धांसाठी वटे बांधा किंवा सिमेंटचे बाकडे ठेवा - युसूफ़, रमेश गंगाधरे

बीड। प्रतिनिधी

शहराच्या मध्यभागी असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर मध्ये बीड नगर परिषदेचे तक्रार निवारण केंद्र सुरू करावे आणि तीन बाजूने वयोवृद्धांसाठी वट्टे बांधावे किंवा सिमेंटचे बाकडे ठेवावे अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.





याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहराच्या मध्यभागी असलेले कारंजा टॉवर ही बीड शहराची ऐतिहासिक ओळख आहे. गेल्या काही वर्षांपासून बीड नगर परिषदेच्या अनास्थेमुळे या ऐतिहासिक इमारतीला अवकळा आली आहे. दहा वर्षांपूर्वी या ऐतिहासिक कारंजा टॉवर बद्दल प्रसिद्धी माध्यमातून लेख लिहिल्यानंतर याचे नूतनीकरण करण्यात आले खरे मात्र त्याला आता दहा वर्षे उलटून गेल्यानंतर सुद्धा नूतनीकरण परिपूर्ण करण्यात आलेले नाही. जुने प्लास्टर काढून नवीन प्लास्टर करण्यात आले तसेच ऐतिहासिक इमारती समोर पाण्याचे कारंजे लावण्यात आले मात्र केलेल्या प्लास्टरवर रंगरंगोटी करण्याचे काम दहा वर्षे उलटूनही करण्यात आले नाही. नूतनीकरणानंतर लावण्यात आलेले पाण्याचे कारंजे अजूनही सुरू करण्यात आलेले नाही. कारंजा टॉवर समोर अनधिकृतपणे मोठमोठे डिजिटल बॅनर्स लावण्यात येतात. काही नतदृष्ट या ऐतिहासिक इमारती समोर कचरा फेकून जातात. यामुळे येथे दररोज मोठ्या प्रमाणात कचरा पडून असतो. या सर्व कारणांमुळे या ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या इमारतीची गरिमा धुळीस मिळत आहे. याचे अवमूल्यन होत आहे. या सर्व अवस्थेतून कारंजा टॉवरची सुटका करण्यासाठी, परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कारंजा टॉवरच्या इमारतीमध्ये बीड नगर परिषदेचे तक्रार निवारण केंद्र सुरू करावे. शहरात राहणाऱ्या शहरवासीयांना अनेक समस्या असतात त्या दूर करण्याकरिता बीड शहरवासीयांच्या सोयीसाठी येथे तक्रार निवारण केंद्र सुरू केल्यास बीड नगर परिषदेकडून ऐतिहासिक कारंजा टॉवरची दररोज साफसफाई करण्यात येईल तसेच परिसर ही स्वच्छ ठेवले जाऊ शकेल. शिवाय नूतनीकरणाअगोदर कारंजा टॉवरच्या इमारती लगत आबालवृद्धांसाठी उंच वट्टे बांधलेले होते मात्र बीड नगर परिषदेच्या दुर्लक्षपणामुळे ते वट्टे जमीनदोस्त झाले होते. नूतनीकरणानंतर ते वट्टे पुन्हा बांधण्यात आले नाही. तेव्हा इमारतीच्या पश्चिम, उत्तर आणि दक्षिण बाजूने आबालवृद्धांसाठी वट्टे बांधण्यात यावे किंवा सिमेंटचे बाकडे ठेवण्यात यावे. पर्यायाने कारंजा टॉवरची होत असलेली दुर्दशा थांबवावी. अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# नगर परिषदेच्या निधीअभावी काळवटी साठवण तलावाच्या उंची वाढीचे काम



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील काळवटी साठवण तलावाच्या उंचीवाढीसाठी ३.९४ कोटी रुपयांचा निधी नगर परिषदेने द्यावयाचा होता. परंतु अद्यापही नगर परिषदेच्या निधी उपलब्ध करून दिला नसल्याने उंचीवाढीचे काम रखडले आहे. त्यामुळे हा निधी लवकरात लवकर उपलब्ध करून घ्यावा असे पत्र बीड पाटबंधारेच्या उपअभियंत्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने ६ सप्टेंबर २०१९ रोजी मंजूर केलेल्या शासन निर्णयानुसार, काळवटी तलावाच्या उंचीवाढीला मंजुरी मिळाली होती. जलसंपदा विभागामार्फत हे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, बदललेल्या दरानुसार या कामाच्या एकूण खर्चात वाढ झाली असल्याचे केज विधानसभा मतदार संघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर संपूर्ण कामासाठी आता ८.११ कोटी रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला. यापैकी भूसंपादनासाठी ४.१७ कोटी रुपये तरतूद केली असून, उर्वरित ३.९४ कोटी रुपयांची मागणी तलावाच्या उंची २ मीटरने वाढवण्यासाठी तसेच दगड बसविणे, मुरुमाचे व काळ्या मातीचे परिक्षण करणे या कामांसाठी करण्यात आली आहे.

यासंदर्भात यापूर्वीच नगरपरिषदेला निधी वर्ग करण्यास सांगण्यात आले होते, मात्र अद्याप निधी मिळालेला नाही. त्यामुळे हे काम रखडले असून, लवकरात लवकर हा निधी मंजूर करावा, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, उंचीवाढीचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर काळवटीची पाणी साठवण क्षमता ०.५ दलघमीने वाढणार आहे.

# उन्हाळ्याची चाहूल, गरिबांचा फ्रीज बाजारात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यंदा जानेवारीच्या शेवटच्या आटवड्यापासून रात्री थंडी तर दिवसभर कडक उन्ह पडत होते. फेब्रुवारी सुरू होताच उन्हाची तीव्रता वाढली आहे. मार्च, एप्रिल, मे महिण्याचा विचार नं केलेला बरा, अशी स्थिती आत्ताच पाहिला मिळत आहे. फेब्रुवारी दुसर्या आठवड्या उन्हाची धग सुरू झाली आहे. थंड पाण्यासाठी मात्र गरिबांचे फ्रीज म्हणून संबोधले जाणार्या मातीच्या माठाला सर्वाधिक मागणी असल्याने शहरात ठिकठिकाणी माठ नव्या आकारात विविध रंगाढंगात बाजारात उपलब्ध झाले आहेत.




अंबाजोगाई तालुक्यात गेल्या आठ दिवसापासुन कडक उन्हाळा सुरु झाला आहे. उकाडा वाढताच प्रत्येकाला उकाड्यापासून सुटका पाहिजे असते. शितपेयाबरोबरच थंड पाण्याची गरज आसते. उन्हाळ्यात तहाण भागवण्यासाठी शहरातील कांही कुटूंब फ्रीज जारच्या पाण्याचा वापर करतात. तर शहरातील गोरगरीब व ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंब, सर्वसामान्य नागरिकांचा कल हा माठाच्या पाण्याकडे असतो.शहरातील विविध भागात आकर्षक असे मातीचे माठ विविध रंगात विक्रीस दाखल झाले आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी उन्हाळ्याच्या दिवसात घरी, शेतात थंड पाण्याचा आनंद घेण्यासाठी बहुतेक शेतकरी, मजुर हे मातीच्या माठाचा वापर आज ही करताना दिसत आहेत. कुंभार बांधव हे मातीपासून बनवलेले छोटे- मोठे माठ हे शंभर रुपयांच्या आसपास विक्री करत असायच्या पण कालांतराने यात अमुलाग्र बदल होउन तुट्टी असलेल्या माठाची मागणी वाढली. उन्हाळा सुरू होत कुंभार बांधव हे मातीपासून बनवलेले छोटे-मोठे माठ हे शंभर रुपयांच्या आसपास विक्री करत असायच्या पण कालांतराने यात अमुलाग्र बदल होउन तुट्टी असलेल्या माठाची मागणी वाढली. उन्हाळा सुरू होत असल्याने स्थानिक व परराज्यातील व्यावसायिकांनी शहरातील विविध ठिकाणी आकर्षक असलेल्या माठांचे स्टॉल बाजारात लागले आहेत.

# प्रत्येक लेखक कवींनी आपला गाव, आई, वडील, मामाच्या गावाला लेखणीतून अजरामर केले -सय्यद अल्लाउद्दीन

**आष्टी । प्रतिनिधी**

कथा,कादंबऱ्या,कविता लेखनाची प्रेरणा जिथून मिळते,जिथे लहानाचा मोठा झालेला आपला गाव,आपले खेडे,आई,वडील,कधीतरी जावयास मिळणारा मामाचा गाव,तिथल्या माणसांचे मिळणारे प्रेम,लेखक,कवींना बरच काही देऊन जातात.मातीचा गंध,प्रेमाचा ओलावा,लेखणीला ऊब देणारा ठरतो.त्यामधूनच काहीतरी लेखन करण्याची उर्मी मिळते.म्हणूनच प्रत्येक लेखक, कवींनी आपल्या गावाला,आई-वडिलांना, मामाच्या गावाला लेखणीतून अजरामर केले. असे प्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन म्हणाले. बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यातील चिंचाळा या जन्मगावी साठाव्या वाढदिवसानिमित्त गावकऱ्यांकडून केलेल्या भव्य सत्कार नंतर ते बोलत होते.आष्टी तालुक्यातील चिंचाळा ता.आष्टी,जि.बीड चे भूमिपुत्र सुप्रसिद्ध कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त चिरंजीव डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांच्या डॉ.सय्यद डेंटल क्लिनिकच्या वतीने चिंचाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थी,विद्यार्थिनींना टूथ ब्रश,टूथपेस्ट,आणि बिस्किट पुड्याचे मोफत वाटप करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापिका हेमलता तरटे,सरपंच पंडित कल्याण पोकळे,पोलीस पाटील गणपत पोकळे,जालिंदर पोकळे,महादेव पोकळे,शाळा समिती अध्यक्ष,मा.सरपंच दिगंबरपोकळे,मा.सरपंच अशोक पोकळे,डॉ.सय्यद हूमायुद्दीन,डॉ.सय्यद वलीयुद्दीन,शिक्षक शिक्षिका,दादासाहेब चव्हाण,दीपक म्हस्के, स्वाती खिलारे,वर्षा गळगटे,बेबी शेख,शबनम शेख आदी उपस्थित होते.

# मुख्य शाखेचे एटीएम मशीन बंद असल्यामुळे ॲक्सेस बँकेच्या ग्राहकांमध्ये नाराजी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील एक्सेसचे एटीएम मशिन गेल्या महिना भरापासून बंद असल्यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. एटीएम मशिन बंद असल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक ग्राहकांना वेळेवर पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे बँकेच्या ग्राहकांमध्ये नाराजी पसरली असून, ग्राहक तीव्र शब्दात निषेध करीत आहेत.

बीड शहरातील शिवाजी महाराजांच्या चौक मुख्य शाखा एक्सेस एटीएम कार्यरत होते. २५ दिवसांपासून ते अचानक बंद झाले. याबाबत ग्राहकांना बँकेकडून कोणतीही पूर्वसूचना दिली नव्हती किंवा एटीएम केंद्र किती दिवस बंद राहणार आहे, याबाबतची माहितीही दिली नव्हती. छत्रपती शिवाजी महाराज जयतीनिमित्त सना निमित्त ग्राहकांना पैशांची गरज असते. पैसे काढण्यासाठी दुसऱ्या बँकेच्या एटीएम मध्ये जावे लागले.आणि इतर बँकेच्या एटीएम मधून व्यवहार झाल्याने जास्तीचे शुल्क आकारले जाते. त्यामुळे ग्राहकांची नाराजी वाढत आहे.

# अविनाश क्षीरसागर आत्महत्या प्रकरणात गुन्हा दाखल

## आरोपीस तात्काळ अटक करा अन्यथा पिडीत कुटुंबासह आंदोलन -दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

मयत अविनाश क्षीरसागर या ऊसतोड मजुराने मुकादमाच्या जाचास कंटाळून आत्महत्या केल्याचा प्रकार काल ता. १४ रोजी सिरसाळा पोलीस स्टेशन हद्दीत घटना घडली होती.

सदरील घटनेत दोन दिवस उलटूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी अभ्यासपूर्ण सातत्याने



पाठपुरावा करून शेवटी आत्महत्यास प्रवृत्त करणे सह अनु. जाती अनु. जमाती प्रतिबंधत्मक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून घेतला. सदरील पान ३ वर

# लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कुसळंब- पिंपळवंडी रस्त्याचे काम रखडले

## कुसळंब व चुंबळी घाटाची दुर्दशा; वाहन चालकांना करावी लागते तारेवरची कसरत

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी ते कुसळंब रस्ता व पैठण पंढरपूर पालखी मार्गातील चुंबळी घाटात अत्यंत खराब होऊन या रस्त्याने वाहनांची मोठी वाहतूक असते.आज त्या रस्त्याची अवस्था खूप भयानक होऊन बसली आहे.या रस्त्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणारच पण काही दुर्घटना घडू नये यासाठी लवकरात लवकर बांधकाम विभागाने सतर्क होऊन या दहावी - बारावीच्या परीक्षेच्या आधी रस्त्याची सोय करावी.या रस्त्यावरील कुसळंब व चुंबळी घाटात संरक्षण भिंत पडल्याने मुख्य वळणावर मोठे खड्डे पडल्याने वाहन चढविणे कठीण झाले आहे.वाहनांना घाट उतरताना व खड्डा चुकवितांना दरीत वाहने पडण्याची भिती आहे.

''रस्ता पॅटर्न -मार्ग समृद्धीचा''. कुसळंब,जरेवाडी, पान ३ वर



# विद्यार्थ्यांनो संशोधक होण्यासाठी आपल्या ज्ञानाचा व्यासंग वाढवा - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी संशोधक होण्यासाठी आपल्या ज्ञानाचा व्यासंग वाढवला पाहिजे, त्या विषयातील खोली वाढवली पाहिजे आणि आपल्या बौद्धिक क्षमतेच्या कक्षा रूंदावल्या पाहिजेत तरच खऱ्या अर्थाने संशोधक म्हणून विद्यार्थी नांवारूपाला येतील असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार उपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

योगेश्वरी महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग यांच्या द्वारे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील सूक्ष्म जीवांचा सभोवतालच्या परिस्थितीमध्ये समतोल राखण्यासाठी असलेली भूमिका या अभ्यास परिषदेमध्ये ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष सी.एल.बर्दापूरकर, प्राचार्य एम.व्ही.कानेटकर, प्रा.अविनाश सोनवणे, उपप्राचार्य आर.व्ही.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी विद्यार्थी हा उपजतच संशोधक असतो शिक्षकांनी त्याच्या ज्ञानात भर घालून त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या पाहिजेत. त्याला विषयाचे ज्ञान संपूर्णपणे दिले पाहिजे जेणेकरून त्या विषयाचा अभ्यास आणि त्या विषयातील बारकावे त्या विद्यार्थ्याला लक्षात आले पाहिजेत आणि त्या विषयाची गोडी निर्माण झाली तर आपोआप विद्यार्थी विविध प्रकारचे संशोधन त्या विषयांमध्ये करू शकतात असे मत डॉ.राजेश इंगोले पान ३ वर





**माजलगाव:- येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात थोर समाज सुधारक,बंजारा समाजाचे गुरु,श्री.संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपाचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत,ज्येष्ठ नेते बबनराव सरवदे,माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके, जि.प.माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबुज, सुभाष गडदे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, युवा नेते अर्जुन नाईकनवरे,कल्याण शेप.**

# अन्नत्याग आंदोलन निमित्ताने आयोजित उपक्रमांमध्ये लोकसहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न करावा; सुदर्शन रापतवार यांचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अन्नत्याग आंदोलन निमित्ताने आयोजित उपक्रमांमध्ये लोकसहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन अन्नत्याग आंदोलनाचे संयोजक सुदर्शन रापतवार यांनी केले.

१९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हान येथील साहेबराव करपे यांनी आपली पत्नी मालती व चार मुलांसह केलेल्या सामुहीक



आत्महत्येला आता ३६ वर्षे होवून गेली आहेत. तेंव्हापासून आज पर्यंत शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरूच आहे.

आजपर्यंत शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्याप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी नवू वर्षा पुर्वी किसान पुत्र आंदोलनाने १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे.या निमित्ताने १९ मार्च रोजी गेली आठ वर्षांपासून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमांच्या पुर्व नियोजनासाठी शहरातील किसान पुत्र यांची एक व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्य संयोजक सुदर्शन रापतवार यांनी अन्नत्याग आंदोलन निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत या सर्व उपक्रमांमध्ये जास्तीत जास्त पान ३ वर

# वाढत्या अपेक्षांनी जुळेनात रेशीमगाठी

## पस्तिशी ओलांडली तरी नवरी मिळेना नवऱ्याला; मुलींकडच्या अपेक्षा वाढल्या


नागनाथ वारद । अंबाजोगाई

मुलगा देखणा आपल्याला शोभणारा असावा, माझ्यापेक्षा जास्त कमावता, शहरात राहणारा हवा, एकत्र कुटुंब नको, शेतकरी तर नकोच... अशा अवास्तव अपेक्षांमुळे उपवरांनी वयाची पस्तिशी ओलांडली तरी नवरी मिळेना नवऱ्याला, अशी अवस्था अंबाजोगाई शहर व परिसरात झाली आहे. मुलाची आर्थिक सुबत्ता असेल, तर परिस्थिती जरा बरी; पण सर्वसामान्य गरीब कुटुंबातील असेल, तर तडजोड आणि प्रसंगी अविवाहित राहण्याचे प्रमाण वाढले आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीमुळे भारतात मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत कमी आहे. त्यात माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, रोजगाराच्या समान संधींमुळे मुलांप्रमाणेच मुलीदेखील उच्चशिक्षित आणि कमावत्या झाल्या आहेत. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होत नाही तोच पान ३ वर

### विवाहयोग्य मुला-मुलींची अनेक स्थळे

**वधू-वर सुचक मंडळाकडे अनेक स्थळे आहेत. मात्र, दोन्ही बाजूंनी अवास्तव अपेक्षा वाढल्या आहेत. पालकांनाही आता घाई राहिली नाही. आणखी चांगले स्थळ आले की सुचवा, असे म्हणत चार चार वर्षे लोटतात. वय वाढले की पुन्हा समस्या उद्भवते.-राहूल देशपांडे,अंबाजोगाई**



# सेविका व मदतनीससाठी आलेले अर्ज लपविण्याचा प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी**

अंबड एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस ५१ पदे मानधनावर भरण्यासाठी अर्ज मागण्यात येत आहे . सदरील अर्ज घेण्याची प्रक्रिया दि१० फेब्रुवारी पासून सुरू झाली आहे. यासंदर्भात किती अर्ज आजपर्यंत आले याची माहिती अंबड पंचायत समिती परिसरातील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्या कार्यालय अंबड अर्ज किती आले या संबंधित ऑफिसच्या कर्मचारी यांना विचारले असता ते म्हणाले की आम्हाला आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश आहे अर्ज किती आले याची माहिती देऊ नका असे सांगण्यात आले परंतु या प्रकरणी अर्ज किती आले हे प्रकरण लपून ठेवण्याचे कारण काय आहे याची उलट सुलट चर्चा सुरू आहे यावप्रकरणी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी चौकशी करावे अशी मागणी होत आहे तसेच याप्रकरणी कार्यालयामधील जबाबदार अधिकारी एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी शिवाजी नागरे हे हजर राहत नसल्याचे दिसून आले. तसेच या प्रकरणी सी डी पी ओ कोमल कोरे यांनी चौकशी करावी व दाखल झालेले अर्जाची माहिती लपून ठेवण्यासंदर्भात शासनाचा काही आदेश असल्यास तो आदेश प्रसिद्धी माध्यमांमार्फत प्रसिद्धी करावे नसता अंबड एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी या कार्यालयाची चौकशी करून कारवाई करावी. अर्ज घेण्यासंदर्भात जिल्हा माहिती कार्यालय मार्फत प्रसिद्धी करण्यासाठी माहिती देण्यात येते मग अर्ज किती आले यासाठी का माहिती लपून ठेवण्यात येते याची उलट सुलट चर्चा सुरू आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# देहूरोड येथे तरुणाचा गोळ्या झाडून खून

**पिंपरी । प्रतिनिधी**

वाढदिवसाच्या कार्यक्रमात झालेल्या भांडणात मध्यस्थी करण्याच्या प्रयत्नात सराईत गुन्हेगाराने पिस्तूलातून गोळी झाडून एका तरुणाचा खून केला. ही घटना गुरुवारी (दि. १३) रात्री साडेअकराच्या सुमारास देहूरोड येथील गांधीनगर येथे घडली.



विक्रम गुरूस्वामी रेड्डी (वय ३७, रा. गांधीनगर, देहूरोड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी नंदकिशोर रामपवित्र यादव (रा. आंबेडकरनगर, देहूरोड) यांनी फिर्याद दिली आहे. रजिया समीर शेख (४९, रा. गांधीनगर, देहूरोड) हिला अटक करण्यात आली आहे. तिचा मुलगा शाबीर समीर शेख (२७, रा. कोंढवा) तसेच फैजल शेख (वय ३०) आणि जॉन ऊर्फ साई तेजा चित्तामल्ला (वय २८) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपी पसार असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची तीन पथके रवाना झाली आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी नंदकिशोर यादव यांचा भाऊ राजकुमार यांच्या मुलीचा वाढदिवस गुरुवारी (दि. १३) होता. वाढदिवसानिमित्त घरासमोर मंडप टाकण्यात आला होता. सर्व जण मंडपाबाहेर उभे असताना आरोपी तेथे आले. आरोपी शाबीर याने नंदकिशोर यांना उद्देशून 'तू मोठी पार्टी देतो आहेस, तुला मस्ती आली आहे' असे म्हणत त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. फैजलने खुर्ची फेकून मारली. भांडण सोडवण्यासाठी राजकुमार आणि विक्रम मध्यस्थी करू लागले. या वेळी रजिया, जॉन आणि फैजल यांनी दगडफेक केली. वातावरण चिघळल्यामुळे विक्रम दुचाकीवरून निघत असताना शाबीर याने त्याच्या दिशेने गोळी झाडली. गोळी विक्रमच्या छातीत लागली. त्यानंतर शाबीरने हवेत दोन गोळ्या झाडल्या. गंभीर जखमी अवस्थेत विक्रमला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. या हल्ल्यात फिर्यादी नंदकिशोर यादव यांच्या नाकाला मार लागल्याने ते जखमी झाले आहेत. आरोपी शाबीर हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर कोंढवा आणि देहूरोड पोलिस ठाण्यात चार गुन्हे दाखल आहेत. तसेच, जॉन याच्यावर तीन गुन्हे आहेत. या घटनेमुळे गांधीनगर आणि आंबेडकरनगर परिसरात तणाव निर्माण झाला. पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या हल्ल्यामागे पूर्ववैमनस्य आहे की, इतर कोणत्या कारणामुळे ही घटना घडली, याचा तपास केला जात आहे. पसार आरोपींच्या शोधासाठी तीन पथके रवाना करण्यात आली आहेत.

# पलंगाखाली पुरलेल्या तिजोरीतील दागिने चोरणारा अटकेत

**पुणे । प्रतिधिधी**

परदेशात राहात असलेल्या एकाच्या बंगल्यात पलंगाखाली पुरून ठेवलेल्या तिजोरीतून १४ लाखांचे दागिने चोरुन पसार झालेल्या चोरट्याला लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून सोन्याचे दागिने आणि एक किलो चांदी असा नऊ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. उरलेल्या दागिन्यांचे त्याने काय केले याचा पोलिस तपास करत आहेत.





संगतसिंग अजमीरसिंग कल्याणी (वय ४५, रा. थेऊर रस्ता, वृंदावन पॅलेसजवळ, लोणी काळभोर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी कल्याणी याच्या साथीदारावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला असून, तो पसार झाला आहे. याबाबत एकाने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार कुवेतमधील एका तेल कंपनीत वित्त विभागात कामाला आहेत. लोणी काळभोर भागातील तरडे परिसरात त्यांचा बंगला आहे. ते वर्षातून तीन ते चार वेळा त्या बंगल्यात वास्तव्यास येतात. त्यांनी शयनगृहातील पलंगाखाली एक तिजोरी केली आहे. या तिजोरीवर फरशी बसविण्यात आली आहे. त्या तिजारोती त्यांनी सोन्याचे दागिने आणि चांदी ठेवली होती. एक फेब्रुवारीला ते कुवेतवरून पुण्यात आले. पलंगाखाली असलेल्या तिजोरीतून दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

३१ जानेवारीला बंगल्यातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. तपासात सराईत चोरटा संगतसिंग कल्याणी आणि साथीदाराने बंगल्यातून ऐवज चोरल्याची माहिती पोलिस उपनिरीक्षक अनिल जाधव यांना खबऱ्याने दिली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने पसार झालेल्या कल्याणीला पकडले. चौकशीत कल्याणी याच्याकडून घरफोडीचे नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत. लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, उपनिरीक्षक अनिल जाधव, पोलिस कर्मचारी गणेश सातपुते, संभाजी देवीकर, विलास शिंदे, सुनील नागलोत, बाजीराव वीर, शैलेश कुदळे, योगेश पाटील, राहुल कर्डिले, प्रदीप गाडे आणि चक्रधर शिरगोरे यांनी ही कामगिरी केली.

# गुंतवणुकीच्या नावाखाली २५ लाखांची फसवणूक

पिंपरी । प्रतिनिधी

शेअर बाजारात ट्रेडिंगच्या बहाण्याने गुंतवणूक करण्यास सांगत एका व्यक्तीची २५ लाख ७६ हजार १५० रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना २१ मे २०२४ ते २३ डिसेंबर २०२४ या कालावधीत किवळे येथे घडली.

फसवणूक झालेल्या व्यक्तीने गुरुवारी (दि. १३) देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार हिमांशू मनराल, मोतीलाल ओसवाल प्रा वेल्थ ऍप कंपनीचा मॅनेजर आणि एका महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यांना ट्रेडिंग मध्ये गुंतवणूक केल्यास चांगला फायदा होईल असे आमिष दाखवले.

त्यासाठी फिर्यादी यांना गुंतवणूक करण्यास सांगून त्यांच्याकडून २५ लाख ७६ हजार १५० रुपये घेत त्यांची फसवणूक केली. देहूरोड पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# 'बार्टी' कर्मचार्यांचे आंदोलन अखेर मागे

**पुणे । प्रतिनिधी**

'बार्टी'च्या शहरातील मुख्य कार्यालयासह राज्यात विविध विभागांत असलेल्या कार्यालयांत बाह्यस्रोताद्वारे कार्यरत असलेल्या सुमारे बाराशे कर्मचार्यांना गेल्या दहा वर्षांपासून वेतनवाढ देण्यात आलेली नाही.



त्यामुळे वेतनवाढ मिळावी, या मागणीसाठी या कर्मचार्यांनी सुरू केलेले बेमुदत आंदोलन शुक्रवारी (दि. १४) मागे घेण्यात आले. वाढीव मानधनाबाबत लेखी आश्वासन देण्यात आल्याने आंदोलन मागे घेण्यात आल्याची माहिती कर्मचार्यांच्या वतीने देण्यात आली.

'बार्टी' कार्यालयात बाह्यस्रोताद्वारे सुमारे बाराशे कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामध्ये वाहनचालक, कार्यालय सहायक, डेटा एंट्री ऑपरेटर, आस्थापना सहायक, संशोधन अधिकरी, प्रकल्प अधिकारी, सहायक प्रकल्प व्यवस्थापक, प्रकल्प व्यवस्थापक, समतादूत, तालुका समन्वयक अशा विविध पदांवर कार्यरत आहेत.

यामध्ये बार्टी मुख्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड, मुक्तिभूमी येवला, बार्टी विभागीय कार्यालय नागपूर, त्याचबरोबर सर्व जिल्हा जातपडताळणी समित्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचार्यांचा समावेश आहे.

सद्य:स्थितीत कार्यरत असलेले सर्व कर्मचारी स्मार्ट सर्व्हिसेस प्रा. लि. (पूर्वीची ब्रिक्स इंडिया प्रा. लि.) या कंपनीच्या अंतर्गत कार्यरत आहेत. वेतनवाढीच्या मागणीसाठी राज्याचे समाजकल्याणमंत्री संजय शिरसट यांना या कर्मचार्यांनी अनेकवेळा निवेदने दिली. मात्र, यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे कर्मचार्यांनी आंदोलन सुरू केले होते. 'बार्टी' संस्थेतील बाह्यस्रोत कंत्राटी कर्मचार्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत समाजकल्याणमंत्री आणि समाजकल्याण विभागाचे प्रधान सचिव यांच्यासोबत दूरध्वनीवरून शुक्रवारी (दि. १४) चर्चा करण्यात आली. त्यानुसार फेब्रुवारीचे वेतन मार्चमध्ये वाढीव मानधनासह देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे.

शासनाकडे मानधनवाढीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामुळे 'काम बंद' आंदोलन मागे घेण्याचे लेखी आवाहन महासंचालक सुनील वारे यांनी केले. लेखी आश्वासन मिळाल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आल्याचे कंत्राटी कर्मचार्यांनी सांगितले.

# डॉ. संजय तांबट यांची अधिष्ठातापदी नियुक्ती



**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचा अधिष्ठाता पदावर संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाचे विभागप्रमुख डॉ. संजय तांबट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच अधिष्ठाता म्हणून पदभार स्वीकारला.

या वेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, व्यवस्थापन परिषद सदस्य बागेश्री मंठाळकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई, प्रा. विनायक जोशी, प्रा. संदीप नरडेले, प्रा. योगेश बोराटे, तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांची प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी नियुक्ती केल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. त्यामुळे कुलगुरूंनी या शाखेच्या अधिष्ठाता पदावर डॉ. तांबट यांची नियुक्ती केली आहे.

# जीबीएसची रुग्णसंख्या २०५ वर; आजाराचे मूळ कारण आले समोर: पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

गइलेन बॅरी सिंड्रोम अर्थात जीबीएसची रुग्णसंख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. पुण्यात जीबीएसचा ९ जानेवारीपासून उद्रेक झाल्याचे पाहिला मिळाले. आत्तापर्यंत या आजाराने ८ जणांचा बळी घेतला आहे. जीबीएसची एकूण रुग्णसंख्या २०५ वर जाऊन पोहचली आहे. या आजाराचे सर्वाधिक रुग्ण हे सिंहगड आणि नांदेड सिटी परिसरात असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे. तसेच जीबीएसची लागण ही दूषित पाण्यामुळे झाल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.





सिंहगड परिसरात आढळलेले ९० रुग्ण नांदेड गावातील विहीर आणि खडकवासला धरणातील पाण्याचा स्रोत वापरणारे आहेत. या परिसरातील ३ रुग्णांचा मृत्यू जीबीएसमुळे झाला आहे. त्यातील दोघांचा मृत्यू जीबीएस तर एकाचा मृत्यू इतर कारणामुळे झाल्याचे पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून खबरदारीचा उपाय म्हणून येथील भागात घरोघरी जात सर्वेक्षण करण्यात आल्यानंतर जीबीएसचे कारण दूषित पाणी असल्याचे समोर आले. सिंहगड परिसरातील रुग्णांमध्ये प्रामुख्याने कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग आढळून आला असून, हेच जीबीएस उद्रेकाचे कारण असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवारी दिली. सिंहगड रस्ता परिसरातील जीबीएस रुग्णांच्या तपासणीमध्ये २५ रुग्णांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणू संसर्ग निष्पन्न झाला आहे. तर ११ रुग्णांना नोरोव्हायरस हा विषाणू संसर्ग झाल्याचे निदर्शनास आले आहे.

# चंद्रकांत पाटील यांच्याकडून मोरे कुटुंबियांचे पालकत्व



**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते आणि संत तुकाराम महाराजांचे वंशज शिरीष महाराज मोरे यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी मोरे कुटुंबियांची भेट घेऊन शिरीष महाराजांना श्रद्धांजली वाहिली आणि मोरे कुटुंबियांचे सांत्वन केले.

महाराजांच्या अकस्मिक जाण्याने मोरे कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य समाज कार्यासाठी समर्पित केलं होतं. त्यांच्या जाण्याने केवळ वारकरी संप्रदायाचे नव्हे; तर समस्त हिंदू समाजाचेही प्रचंड नुकसान झाले आहे. अशी भावना व्यक्त करत त्यांच्या कुटुंबाचे संपूर्ण पालकत्व घेत असल्याचे यावेळी सांगितले. दरम्यान, महाराजांच्या लहान भगिनीला नोकरी किंवा व्यवसायासाठी मदत करण्यासह तिच्या विवाहाची सर्व जबाबदारी घेत असल्याबद्दल पाटील यांनी मोरे कुटुंबियांना आश्वास्त केले.

# बिबट्याची मादी जेरबंद; वन विभागाला आले यश

**पुणे । प्रतिनिधी**

राहू (ता. दौंड) येथील शिंदे नगर परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याची साधारणता पाच वर्षे वयाची मादी पिंजऱ्यात जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले. अशी माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.




या परिसरात अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने येथील अनेक पाळीव प्राणी मोठ्या प्रमाणात फस्त केले होते. तसेच नागरिकांमध्ये सुद्धा भीतीचे वातावरण होते. वनविभागाने बिबट्याला ताब्यात घेऊन. मादीची वैद्यकीय तपासणी करून मादीला अभयारण्यात सुखरूप पोहोचवणार असल्याची माहिती वन विभागाच्या वतीने देण्यात आली. दौंड तालुक्यातील नदी पट्ट्यात तसेच राहू बेट परिसरात बिबट्याचा वावर गेल्या अनेक वर्षांपासून वाढलेला आहे.

उसाची शेती मोठ्या प्रमाणात आहे . मुळा-मुठा आणि भीमा नदीचा परिसर व त्या भोवताली असणारे हजारो एकरांचे कुरण त्यामुळे बिबट्याला लपायला अधिक वाव आहे. बिबट्याना पकडण्यासाठी शर्थीने प्रयत्न सुरू केले असून येथील शेतकऱ्यांनी तात्पुरता सुटकेचा श्वास घेतला आहे. राहू बेट परिसरात उर्वरित बिबटे जेरबंद करण्यासाठी वन विभागाने पावले उचलावीत अशी मागणी होत आहे. मोठ्या प्रमाणात वाढलेले बिबटे त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण आहे. दौंड वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बिबट्याच्या मादीला अखेर जेरबंद केले. सदर वन्य प्राण्यांची तपासणी करून त्यास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले.

# पूर्व हवेलीत रोहित्र चोरांचा सुळसुळाट

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, थेऊर, कोरेगाव मूळ, टिळेकरवाडीसह पूर्व हवेलीतील नदी व कालव्याच्या पट्टयातील भागात विद्युत रोहित्र चोरांचा सुळसुळाट झाला आहे. त्यामुळे नागरिकांना पाणी असून पिकांना पाणी देता येत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. मागील ६ महिन्यांत ३९ रोहित्र चोरी झाली असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली आहे.



मागील अनेक दिवसांपासून नदीच्या पट्यातील कोरेगाव मूळ, बिवरी, थेऊरसह परिसरातील गावांमधून रोहित्रांची चोरी सातत्याने होत आहे. अनेक गावांतील निर्मणुष्य भागातील तसेच नदीकाठचा भाग, गावापासून दूर असलेल्या वस्ती परिसरातील विद्युत रोहित्र चोर्यांचे प्रमाण वाढले आहे. तांब्याचे वाढते भाव यामुळे चोरीचे प्रमाण वाढले असून याबाबत लोणी काळभोर, उरुळी कांचन पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र पोलीस प्रशासन शोध घेत नाही की दुर्लक्ष करीत आहे, अशी शंका परिसरातील नागरिकांच्या मनात येत आहे.

चोरीचे तांबे विक्रेते आणि मोड घेणारे पोलीस खात्यास माहीत नाही का? अशी चर्चा नागरिक आपसात करीत आहेत. सगळ्याच तक्रारी पोलीस ठाण्यात होत नाहीत. तसेच यामुळे शेतकर्यांच्या पिकास पाणी न मिळाल्याने शेत मालाचे नुकसान होते. पिण्याच्या पाण्याची गैरसोय अशा आपत्तींना तोंड द्यावे लागते. रोहित्रांच्या चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन पोलीस तपास यंत्रणाने लवकरात चोरट्यांचे रॅकेट पकडावे व शेतकर्यांचे होणारे नुकसान टाळावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, चालू विद्युत प्रवाह बंद करणे, प्रचंड वजनाचे विद्युत रोहित्र खाली घेणे, त्यातील तांब्याच्या तारा चोरणे व काही मिनिटांच्या आतच पोबारा करणे या करिता विद्युत रोहित्र फोडण्यासाठी सुसज्ज यंत्रणेसह पाच ते सहा जणांची टोळीच कार्यरत असल्याचा संशय नागरिकांना आहे. पोलिसांनी अशा चोरट्यांच्या तातडीने मुसक्या आवळण्याची गरज आहे.

# साखर कारखान्याच्या संचालकपदाच्या २१ जागांसाठी ६८ उमेदवारी अर्ज

**नारायणगाव । प्रतिनिधी**

विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी (दि. १४) संचालकपदाच्या २१ जागांसाठी ६८ उमेदवारी अर्ज दाखल झाले. निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी ही माहिती दिली.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ४६ अर्ज दाखल झाले. यामध्ये जुन्नर गटातील तीन जागांसाठी पाच उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. यात देवराम लांडे, शिवम घोलप, अशोक घोलप, अविनाश पुंडे, देवेंद्र खिल्लारी यांचा समावेश आहे.



शिरोली गटामधून तीन जागांसाठी दहा अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी तीन अर्ज दाखल केले. या गटात जालिंदर ढोमसे, प्रमोद खांडगे, विठ्ठल कदम, रहमान इनामदा, संतोष खैरे व सुधीर खोकराळे आणि प्रवीण ढेरे यांचा समावेश आहे. ओतूर गटातील चार जागांसाठी सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले. संजय शेटे धनंजय डुंबरे, बाळासाहेब घुले, पंकज वामन, रामदास वेठेकर व मधुकर यंदे यांचा समावेश आहे. पिंपळवाडी गटामध्ये तीन जागांसाठी १७ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये अंबादास हांडे, संभाजी पोखरकर, धनंजय लेंडे, संजय भुजबळ, मंगेश हांडे, प्रकाश डावखर, नंदकुमार हांडे, रमेश हांडे, बबन गुंजाळ, शरद चौधरी, अशोक हांडे, माणिक हांडे, विवेक काकडे, विलास दांगट, प्रकाश जाधव, जयवंत घोडके व नामदेव शिंदे यांचा समावेश आहे. घोडेगाव गटातील तीन जागांसाठी सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. येथे नामदेव पोखरकर,मार्तंड टावरे, दत्तात्रय निघोट, यशराज काळे, नामदेव थोरात व दत्तात्रय थोरात या नावांचा समावेश आहे. अनुसूचित जाती-जमाती गटामध्ये एका जागेसाठी देवराम लांडे, विलास रावते, प्रकाश सरोगदे, चंद्रकांत तळपे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

महिला राखीव प्रतिनिधी गटाच्या एका जागेसाठी पाच अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये सविता शिंदे, सुरेखा गांजाळे, नीलम तांबे, पल्लवी डोके, संगीता घोडके या नावांचा समावेश आहे. इतर मागासवर्गीय प्रतिनिधी गटामधून एका जागेसाठी तब्बल १२ अर्ज दाखल झाले आहेत.